मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २६७ | बुधवार, १० जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# दुसरी लाईफलाइन ठरतेय ‘काळ’

## वर्षभरात ‘बेस्ट’च्या धडकेत ३२ जणांचा मृत्यू

**मुंबई :** मुंबई उपनगरीय रेल्वेनंतर मुंबईकरांची दुसरी लाईफलाइन म्हणून बेस्टची ओळख. मात्र मार्च २०२५ ते मार्च २०२६ या वर्षभरात बेस्ट बसच्या १०८ अपघातांत ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक ७७ अपघात भाडेतत्त्वावरील बसचे, ३१ अपघात बेस्टच्या स्वमालकीच्या बसचे झाले आहेत.

बेस्ट उपक्रमाच्या दोन हजारांहून अधिक बसच्या माध्यमातून दररोज २५ लाख प्रवासी प्रवास करतात. बेस्ट उपक्रमाने प्रवाशांच्या गार व पर्यावरण संवर्धनासाठी इलेक्ट्रिक एसी बसचा समावेश ताफ्यात करण्यास सुरुवात केली. मात्र भाडेतत्त्वावरील बसच्या अपघातात वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईची दुसरी लाईफलाइन पादचारी, प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा ठरत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

मुंबईतील ‘बेस्ट’ उपक्रमाच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक आणि वातानुकूलित बसेस दाखल झाल्या आहेत. मात्र, गेल्या काही काळातील वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे या बसेसच्या सुरक्षिततेवर आणि चालकांच्या प्रशिक्षणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः ‘वेट-लीज’ अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बसेस आणि ‘ऑलेक्ट्रा’ कंपनीच्या इलेक्ट्रिक बसेसच्या अपघातांची आकडेवारी चिंताजनक आहे.



**प्रमुख बेस्ट बस अपघात :**

**मालाड टॅक्सी अपघात (४ जून २०२६)**

मालाड (पूर्व) येथील पुशपा पार्कजवळ एका बेस्ट बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ओला टॅक्सीला मागून जोरदार धडक दिली होती. या दरम्यान टॅक्सीचालक हा गाडी साफ करत असताना हा अपघात झाला. या अपघातात संबंधित ५० वर्षीय टॅक्सीचालकाचा जागीच मृत्यू झाला होता.

**भांडुप पश्चिम अपघात (डिसेंबर २०२५)**

भांडुप रेल्वे स्थानकाबाहेरील गर्दीच्या परिसरात चालकाने इलेक्ट्रिक बस सुरू करताना गिअर मोड समजण्यात चूक केली. बस न्यूट्रल मोडमध्ये आहे असे समजून त्याने ॲक्सिलेटर दाबला, मात्र बस ड्राइव्ह मोडमध्ये असल्याने ती थेट फुटपाथवरील पादचाऱ्यांवर जाऊन धडकली. या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला आणि १० हून अधिक लोक जखमी झाले.

**कुर्ला पश्चिम येथील भीषण अपघात (९ डिसेंबर २०२४)**

कुर्ला (पश्चिम) भागात कंत्राटी पद्धतीवरील एका इलेक्ट्रिक बसचे नियंत्रण सुटल्याने तिने रस्त्यावरील अनेक वाहनांना आणि पादचाऱ्यांना चिरडले. हा मुंबईतील बेस्ट बसच्या सर्वात भीषण अपघातांपैकी एक मानला जातो. या दुर्घटनेत ८ नागरिकांना जीव गमवावा लागला. तर ४० पेक्षा जास्त लोक जखमी झाले होते.

**...असे दिले जाते चालकांना प्रशिक्षण**

भाडेतत्त्वावरील बसगाड्या पुरवठादार व्यावसायिक संस्था यांना बसचालकासहीत बसगाड्या पुरविणे अनिवार्य असल्यामुळे बसचालकांना दिंडोशी वाहतूक प्रशिक्षण येथे विद्यमान स्थितीत २१ दिवस प्रत्यक्ष बसगाडीवर तसेच ६ दिवस वर्गामध्ये उजळणी वर्गाचे प्रशिक्षण देण्यात येते.

आगारस्तरावर विभागीय वाहतूक पोलीस यांच्याकडून तसेच वाहतूक प्रशिक्षण केंद्र, दिंडोशी यांच्याकडून वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी समुपदेशनाचे आयोजन करण्यात येते.

मार्ग तपासणीदरम्यान पर्यवेक्षकीय कर्मचारी तसेच अधिकारी यांच्याकडून सदोष वाहन चालन आढळणाऱ्या बसचालकांवर कारवाई करण्यात येते.

भाडेतत्त्वावरील बसगाड्यांमध्ये ई-बसगाड्यांचा मोठ्या प्रमाणात अंतर्भाव असल्यामुळे सदर बसगाड्यांवरील अद्ययावत कार्यप्रणालीबाबतचे रितसर प्रशिक्षण, दिंडोशी प्रशिक्षण केंद्र येथे देण्यात येते.

# दैनिक युवक आधार इम्पॅक्ट

## बातमी प्रकाशीत होताच अखेर उमरी रेल्वे स्थानकातील लिफ्ट प्रवाशांच्या सेवेसाठी चालू






Page 09 Jun 2026

दैनिक युवक आधार Epaper.YuvakAadhar.In

मुख्यसंपादक : भारती संतोष आमले - 9220403509

उमरी रेल्वे स्थानकातील लिफ्ट बंद नागरिकांचे बेहाल प्रशासनाचे दुर्लक्ष

दैनिक युवक आधार उमरी वार्ताहर रुपेशकुमार. श्रीरामवार : उमरी रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ वरून २ वर जाण्यासाठी लिफ्ट सुविधा उभारण्यात आली आहे. लिफ्टचे काम देखील पूर्ण झाले असून मात्र [illegible]

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी रेल्वे स्थानकातील लिफ्ट बंद असल्याचे बातमी प्रकाशीत होताच याची दखल घेऊन निजामाबाद रेल्वे विभागाने प्रवाशाच्या सेवेसाठी लिफ्ट चालु करून देण्यात आली आहे. उमरी येथील रेल्वे स्थानकातील लिफ्टचे उद्धाटन हैद्राबाद डिव्हिजन रेल्वे डी.आर. यु.सी.सी.मेंबर पारसमलजी दर्डा व उमरी रेल्वे स्टेशन अधीक्षक भरतलाल मिना यांच्या शुभ हस्ते फित कापुन लिफ्टचे उदघाटन करण्यात आले. उमरी रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या सेवेसाठी असलेली लिफ्ट ही गेल्या आठ महिन्या पासुन तयार झाली होती. मात्र लिफ्ट ही अध्यापही चालु करण्यात आली नसल्याने दिव्यांग, वृध्द जेष्ठ नागरिक, रुग्णांना व प्रवाशाना प्लेटफॉर्म 1 वरून 2 वर येण्या व जाण्यासाठी त्रास होत होता.

या संदर्भात लिफ्ट चालू करण्यासाठी बातम्या प्रकाशित करण्यात आली होती. याची दखल घेऊन निजामाबाद रेल्वे विभागाने प्रवाशाच्या सेवेसाठी लिफ्ट चालु करून देण्यात आली आहे.सदरील लिफ्टच्या उद्यानास उपस्थित रेल्वे डी.आर.यु.सी.सी.मेंबर पारसमलजी दर्डा , उमरी रेल्वे स्टेशन अधीक्षक भरतलाल मिना, लिफ्ट टेक्निशियन शेख रसूल साब, टेक्निशियन महेंद्र इलेक्ट्रिशन स्वप्निल फिरंगवाड , सीनियर टेक्निशियन निजामबाद उत्तम जाधव , उमेश निखाते, शुभम पवळे आदी रेल्वे कर्मचारी व प्रवासी कार्यक्रमास उपस्थित होते.

# कळंबोलीत विजेचा लपंडाप ; नागरिक उतरले रस्त्यावर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली उपनगरात सोमवारी रात्री वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना उकाड्यात रात्र जागून काढावी लागली. रात्री अनेक वेळा वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर सव्वा अकराच्या सुमारास वीजपुरवठ्याचा एक प्रवाह बंद पडल्याने उपनगरातील मोठा भाग अंधारात गेला. संतप्त नागरिकांनी रात्रीच महावितरणच्या उपकेंद्रात धाव घेतली. कामोठ्यातील वीजप्रश्न सोडविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष दिले असताना कळंबोलीत मात्र विजेचा लपंडाव सुरू राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कळंबोली उपनगरातील वीज ग्राहकांना सोमवारची रात्र उकाड्यात काढावी लागली. रात्री साडे दहा वाजता पहिल्यांदा तीन वेळा वीज गायब झाली. त्यानंतर सव्वा अकरा वाजता विजेच्या तीन प्रवाहांपैकी एक प्रवाह बंद पडला. त्यामुळे निम्म्या उपनगरात वीज आणि अनेक घरांमध्ये अंधार अशी स्थिती



निर्माण झाली. विजेच्या लपंडावामुळे हैराण झालेले अनेक कळंबोलीकर रात्रीच रस्त्यावर उतरले आणि त्यांनी उपनगरातील सिडको कार्यालयासमोरील वीज उपकेंद्रात धाव घेतली. उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना वीज कधी येणार, असा प्रश्नांचा भडीमार करण्यात आला. जमावातील तरुणांची संख्या वाढू लागल्याने तेथे कळंबोली पोलिसांना पाचारण करण्यात आले. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांच्या सुरक्षेत महावितरणच्या उपकेंद्राचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले. त्यामुळे तेथे जमलेल्या नागरिकांची संख्या आणखी वाढली. या दरम्यान महावितरणकडून वाढलेल्या वीज मागणीमुळे दुरुस्तीचे काम सुरू असून काही वेळात वीजपुरवठा पूर्ववत होईल, असे सांगण्यात आले. अखेर रात्री एक वाजता वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. विशेष म्हणजे शनिवार आणि रविवारीदेखील रात्री अकराच्या सुमारास अशाच प्रकारे वीजपुरवठा खंडित झाला होता.

कामोठे उपनगरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तेथील रहिवाशांनी शनिवारी मध्यरात्री उत्स्फूर्त रास्तारोको करून महावितरणच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी सोमवारी कामोठे उपकेंद्राला भेट देऊन अभियंत्यांसमवेत आढावा घेतला. त्यांच्या निर्देशानुसार सोमवारी रात्री कामोठ्यात अखंडित वीजपुरवठा राखण्यासाठी अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. मात्र कामोठ्यात वीजपुरवठा सुरळीत राहिला असताना कळंबोलीत वीजपुरवठा खंडित झाला. विकसित पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभारले जात असल्याने आणि उन्हाळ्यात रात्रीच्या वेळेत वीजेची मागणी वाढत असल्याने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# फसव्या कर्ज माफीच्या परिपत्रकाची ११ जूनला होळी - कॉ.महादेव नागरगोजे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी "शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू" असे गाजावाजा करत आश्वासन दिले, मात्र सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची सर्रास फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे यांनी राज्य सरकार विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६" ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आणि फसवी कर्जमाफी असल्याचा आरोप करत या योजनेच्या परिपत्रकाची (जी. आर.) होळी करण्याचा इशारा देण्यात आला आहे. किसान सभेच्या वतीने



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणुकीपूर्वी दिलेल्या संपूर्ण कर्ज माफीच्या आश्वासनाचा सरकारला विसर पडला असून आता केवळ दिखाऊ आणि तुटपुंज्या कर्ज माफीद्वारे शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. राष्ट्रीयकृत बँका व सेवा सहकारी संस्थांनी सप्टेंबर-२०२५ पूर्वीच "नवे-जुने" करून लाखो शेतकऱ्यांना कर्ज माफीच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा कट रचल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, एकीकडे मुख्यमंत्री ३० जून-२०२६ पर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याची भाषा करतात, तर दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कारण पुढे करून कर्जमाफी टाळण्याचा प्रयत्न करतात. ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्ज माफीची घोषणा ही केवळ आकड्यांची जादू असून प्रत्यक्षात लाखो शेतकरी लाभापासून दूर राहणार असल्याचा दावा किसान सभेने केला आहे. तामिळनाडू सरकारने सत्तेत आल्यानंतर अल्पावधीत शेतकऱ्यांची कर्ज माफी केली, मात्र महाराष्ट्र सरकार केवळ घोषणा आणि परिपत्रकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची टिका निवेदनात करण्यात आली आहे. या कथित फसव्या कर्ज माफीच्या निषेधार्थ गुरुवार दिनांक ११ जून-२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता पाटोदा येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र शासनाच्या जी.आर.ची जाहीर होळी करण्यात येणार असल्याची घोषणा किसान सभेने केली आहे. या निवेदनावर किसान सभा उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे, सुखदेव नागरगोजे, भरत नागरगोजे, रावसाहेब गिते, दिनकर नागरगोजे, रामकुवर नागरगोजे, रामकिसन गिते, जालिंदर शिडगे सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. "संपूर्ण कर्जमाफी द्या, शेतकऱ्यांची फसवणूक थांबवा" या मागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ही किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# मराठी करिता सर्व साहित्य एकत्रित कार्य करावे - प्रदीप निफाडकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** मराठी भाषा आणि सकस साहित्या करिता सर्व साहित्य संस्थांनी एकत्रित येऊन कार्य करावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष गझलकार प्रदीप निफाडकर यांनी पनवेल येथे केले. पनवेल उरण आगरी समाज मंडळ के गोलीमय वाचनालय पर्ण विचार मंच कोमसाप पनवेल व नवीन पनवेल शाखा या साहित्य संस्थांच्या वतीने प्रदीप निफाडकर यांच्याशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मसापाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने आगरी



समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

आगामी काळात मराठी भाषा, ग्रंथालय, स साहित्य संमेलनापूर्वी पनवेल मध्ये सुद्धा साहित्य संमेलन नियोजित करावे असे सांगून पु ल देशपांडे ,आचार्य अत्रे यांच्या काळातील काही साहित्य संस्था विषयीच्या आठवणींना उजाळा त्यांनी दिला. यावेळी विजय गायकर,सुनीता जोशी, अपर्णा नाडगौंडी, श्री. पोटे, किर्ती जोशी, नंदकुमार शिंदे आदी उपस्थित होते.

# अमरधाम स्मशानभूमीतील गॅस दाहिनी दुरुस्तीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते (पनवेल) :** अमरधाम स्मशानभूमी येथे असलेली गॅस दाहिनी सध्या नादुरुस्त अथवा अपूर्ण क्षमतेने कार्यरत असल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस दाहिनी बंद असल्याने अंत्यसंस्कार प्रक्रियेत विलंब होत असून नागरिकांची गैरसोय वाढत असल्या बाबतचे निवेदन देण्यात आले.




यासंदर्भात प्रभाग क्रमांक १८ चे अध्यक्ष महेश रघुनाथ सरदेसाई यांनी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन जयराम पाटील यांना निवेदन सादर करून तात्काळ दुरुस्ती आणि देखभालीची मागणी केली आहे. येणारा पावसाळा लक्षात घेता गॅस दाहिनीची तांत्रिक तपासणी करून आवश्यक असल्यास नवीन यंत्रणा बसविणे किंवा विद्यमान दाहिनीची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी दाहिनीची नियमित देखभाल व तपासणी करण्याची आवश्यकता देखील निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन महापौर नितीन जयराम पाटील यांनी या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले 09 जून 2026 रोजी हे निवेदन महापौर कार्यालयात सादर करण्यात आले. यावेळी राजा चव्हाण, सचिन नाझरे आणि सुधीर देसाई उपस्थित होते

# वाढत्या महागाई विरोधात पनवेलमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा जनआक्रोश मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून भाजप सरकार हे फक्त लोकांना गाजर दाखवून फसवणूक करत असल्याने याच्या निषेधार्थ आज पनवेलमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे जनआक्रोश मोर्चा काढून भाजप सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.



सदर मोर्चा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तहसील कार्यालयावर शेकडो शिवसैनिक, महिला आघाडी व युवा सैनिकांच्या साथीने काढण्यात आला. या मोर्चामध्ये उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांच्यासह सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, जिल्हाप्रमुख दिपक निकम, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, रामदास पाटील, महानगरप्रमुख ॲड.समाधान काशिद, गटनेत्या लिना गरड, मा.जिल्हाप्रमुख शिरिष बुटाला, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, ज्ञानेश्वर बडे, शहरप्रमुख प्रवीण जाधव, यतीन देशमुख, सदानंद शिर्के, रामदास गोवारी, सुर्यकांत म्हसकर, प्रदीप केणी, नगरसेविका प्रगती पाटील, रितीशा गोवारी, प्रिया गोवारी, मेघना घाडगे, आर्या जाधव, उत्तम मोर्बेकर, नितीन गावंड, महिला आघाडीच्या संगीता राऊत, उज्वला गावडे, ज्योती मोहिते, मालती पिंगळा, सानिका मोरे, समिक्षा पांगम यांच्यासह शेकडो शिवसैनिक या जनआक्रोश मोर्चामध्ये सहभागी झाले होते. यावेळी बोलताना उपनेते बबनदादा पाटील यांनी सांगितले की, जनता महागाईने त्रस्त झाली असून शासन पैशाचे खोके वाटून उमेदवार विकत घेण्याचे काम करत आहे. महागाईमुळे जनता मेटाकुटीस आली आहे. असे असताना सरकार फक्त लेडीज बार, जुगार अड्डे आदींना परवानग्या देत आहेत. हे कुठल्याही परिस्थितीत शिवसेना बंद करणार आहे. फक्त अधिवेशनाच्या काळात बंद करण्यात येणारे लेडीज बार हे कायमस्वरुपी आता शिवसैनिक रस्त्यावर उतरुन बंद करणार असल्याचा इशारा सुद्धा त्यांनी दिला आहे. तर यावेळी बोलताना रायगड जिल्हासंपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांनी शासनाचे वाभाडे काढून इंधन दरवाढीसह, गॅस दरवाढ करून सरकार सर्वसामान्य जनतेला लुटण्याचे काम करत आहे. परंतु या सरकारचा पापाचा घडा भरत आला असून पुढील काळात महाविकास आघाडीची सत्ता महाराष्ट्रात परतेल असा त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे.

यावेळी रस्त्यावर महिलांनी भाकरी भाजून व रिकामे सिलेंडर आणून तहसीलदार मिनल भोसले-भामरे यांना भेट दिल्या. तसेच निवेदन देवून शासनाविरोधात असलेला रोष त्यांच्या समोर व्यक्त केला.

# पनवेल तालुक्यात घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर ; मनसेचा प्रशासनाला इशारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना.ता.पनवेल पनवेल तालुका आता जागा होण्याची वेळ आली आहे!

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील गावागावांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. पण आज सर्वात गंभीर आणि थेट जनतेच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न म्हणजे घनकचऱ्याची विल्हेवाट आणि स्वच्छतेचा अभाव.कचऱ्याचे ढीग वाढत आहेत, दुर्गंधी वाढत आहे, रोगराईचा धोका वाढत आहे, पण प्रशासन मात्र शांत आहे. हा प्रश्न ना नवीन आहे, ना अवघड आहे. तरीसुद्धा वर्षानुवर्षे तो प्रलंबित ठेवला जात आहे. यामागे प्रशासनाची उदासीनता आहे की काहींची मक्तेदारी, हा प्रश्न आता जनतेच्या मनात निर्माण होत आहे.पंचायत समिती पनवेल गट विकास अधिकारी गेल्या वर्षांपासून पदभार सांभाळत आहेत, यांनी आता केवळ आश्वासने न देता ठोस कृती करावी. ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छता, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे.



गावांचा विकास केवळ कागदावर नको, तर प्रत्यक्षात दिसला पाहिजे. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलली नाहीत, तर लोकशक्ती आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्यास मागेपुढे पाहणार नाही.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही पनवेल तालुक्यातील प्रत्येक मराठी माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. प्रत्येक गाव, प्रत्येक वाडी आणि प्रत्येक नागरिकाच्या प्रश्नासाठी आम्ही संघर्ष करू आणि न्याय मिळवून देऊ.

"आरोग्याचा प्रश्न हा राजकारणाचा विषय नाही, तर जनतेच्या जगण्याचा विषय आहे!""कचऱ्याचे ढीग नाही, विकासाचे नवे पर्व हवे!"

# विकल्या गेलेल्या बाळ माने यांच्या फोटोला मारले महिला आघाडीने जोडे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पैशाच्या लालसेपोटी विकल्या गेलेल्या बाळ मानेंचा जोरदारपणे आज पनवेल येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर महिला आघाडीने निषेध करून त्यांच्या फोटोला चप्पला मारल्या.ज्या मातोश्रीने भावाप्रमाणे प्रेम दिले अशा मातोश्रीचा विश्वासघात करून कोकण विधानपरिषद मध्ये उमेदवारी घेवून ती उमेदवारी विरोधकांना विकून माघार घेणाऱ्या बाळ मानेंचा जोडे मारुन निषेध केला. यावेळी उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांच्यासह सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, जिल्हाप्रमुख दिपक निकम, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, रामदास पाटील, महानगरप्रमुख ॲड.समाधान काशिद, गटनेत्या लिना गरड, मा.जिल्हाप्रमुख शिरिष बुटाला, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, ज्ञानेश्वर बडे, शहरप्रमुख प्रवीण जाधव, यतीन देशमुख, सदानंद शिर्के, रामदास गोवारी, सुर्यकांत म्हसकर, प्रदीप केणी, नगरसेविका प्रगती पाटील, रितीशा गोवारी, प्रिया गोवारी, मेघना घाडगे, आर्या जाधव, उत्तम मोर्बेकर, नितीन गावंड, महिला आघाडीच्या संगीता राऊत, उज्वला गावडे, ज्योती मोहिते, मालती पिंगळा, सानिका मोरे, समिक्षा पांगम, किरण सोनावणे आदींसह इतर शिवसैनिक उपस्थित होते.



# ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवदचे सदस्य श्री. संदीप भगवान मस्कर यांची मागणी

## सिडकोच्या चुकीच्या पुनर्विकासामुळे युगांतमधील रहिवासी भरडले

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर नवीन पनवेल, प्रतिनिधी :** ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवदचे सदस्य श्री. संदीप भगवान मस्कर यांनी युगांत परिसरातील धोकादायक घोषित करण्यात आलेल्या आणि दीर्घकाळ बंद असलेल्या सदनिकांवरील मालमत्ता कराबाबत फेरविचार करून करसवलत अथवा करमाफी देण्याची मागणी ग्रामपंचायतीकडे केली आहे.

सिडकोच्या चुकीच्या पुनर्विकास धोरणामुळे आणि वर्षानुवर्षे रखडलेल्या पुनर्विकास प्रक्रियेमुळे युगांत परिसरातील अनेक इमारती धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. परिणामी अनेक कुटुंबांना आपली घरे सोडून भाड्याच्या घरात किंवा अन्य ठिकाणी स्थलांतर करावे लागले आहे. संबंधित सदनिका पूर्णपणे बंद असून त्यांचा कोणत्याही प्रकारे वापर होत नसतानाही त्यांच्यावर मालमत्ता कर आकारला जात असल्याने रहिवाशांमध्ये नाराजी आहे.



याबाबत श्री. मस्कर यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना निवेदन देऊन, सिडकोच्या नियोजनातील त्रुटी व रखडलेल्या पुनर्विकासाचा फटका नागरिकांना बसत असताना त्यांच्यावर अतिरिक्त कराचा बोजा टाकणे योग्य नसल्याचे म्हटले आहे.

आधीच घरभाडे, शिक्षण, आरोग्य आणि इतर खर्चांचा भार सहन करणाऱ्या नागरिकांना मालमत्ता करामुळे आणखी आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

### वापरात नसलेल्या घरांवरील मालमत्ता करात सवलत देण्याची मागणी

त्यामुळे प्रत्यक्ष वास्तव्यास नसलेल्या व अनेक वर्षे बंद असलेल्या सदनिकांच्या बाबतीत विशेष बाब म्हणून सहानुभूतीपूर्वक विचार करून मालमत्ता करात सवलत अथवा माफी द्यावी, तसेच अशा प्रकरणांबाबत स्पष्ट धोरण जाहीर करून नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

स्थानिक नागरिकांनीही ग्रामपंचायतीने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहून सिडकोच्या रखडलेल्या पुनर्विकासाचा फटका बसलेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# वेंगुर्ला शहरात वारंवार वीज खंडित; नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला शहर तसेच परिसरातील गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त केला जात आहे.

शहरातील विविध भागांमध्ये दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होणे, कमी-जास्त दाबाने वीज येणे, तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीज जाणे, हे प्रकार आता नित्याचे झाले आहेत. विशेषतः रात्री उशिरा आणि पहाटेच्या सुमारास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांची झोपमोड होत असून ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या उष्ण व दमट वातावरणामुळे रात्रीच्या वेळी वीज खंडित झाल्यानंतर नागरिकांना घरात राहणेही कठीण होत आहे. अनेक भागांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला असून वीज नसल्यामुळे नागरिकांना रात्रभर जागून काढावी लागत आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर तसेच घरून काम करणाऱ्या नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावरही याचा विपरीत परिणाम होत आहे.

वीजपुरवठा वारंवार खंडित होणे आणि काही वेळा काही मिनिटांच्या अंतराने वीज ये-जा होण्याच्या प्रकारांमुळे घरगुती तसेच व्यावसायिक वापरातील महागडी इलेक्ट्रॉनिक उपकरणे धोक्यात आली आहेत. फ्रिज, टीव्ही, संगणक, इन्व्हर्टर, एअर कंडिशनर यांसारख्या उपकरणांचे नुकसान होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांनी महावितरणकडे अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचा आरोप केला आहे. वीजपुरवठा खंडित होण्यामागील नेमकी कारणे, दुरुस्तीचे काम अथवा तांत्रिक बिघाड याबाबत नागरिकांना कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने संताप अधिक वाढत आहे.

दरमहा नियमितपणे वीज बिले भरूनही दर्जेदार व अखंडित वीजसेवा मिळत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे महावितरण प्रशासनाने वारंवार होणाऱ्या वीज खंडितीची कारणे जाहीर करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, तसेच भविष्यात अशा समस्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची हमी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

वेंगुर्ला शहर आणि परिसरातील नागरिकांना सध्या भेडसावत असलेल्या या गंभीर समस्येकडे प्रशासन व महावितरणने तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

# क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांना पालोद ग्रामपंचायतीत अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी पालोद ग्रामपंचायतीच्या वतीने उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बिरसा मुंडा यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना, त्यांच्या संघर्षाचा आदर्श समोर ठेवून जनहितार्थ कार्य करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमास उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, अमजद पठाण, अनिल सपकाळ, रामेश्वर समिंद्रे, योगेश पालोदकर, संतोष सपकाळ, शकील मोहम्मद यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# श्रीवर्धनमध्ये जोरदार पावसाची हजेरी; उन्हाच्या झळांपासून दिलासा, शेतकरी राजा सुखावला

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाने आणि वाढत्या उष्णतेने हैराण झालेल्या श्रीवर्धनकरांना अखेर पावसाने दिलासा दिला आहे. तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. पावसाच्या आगमनामुळे पेरणीच्या कामांना वेग मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत, तर धरणी मायही या जलवर्षावाने सुखावल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे.यावर्षीच्या उन्हाळ्यात श्रीवर्धन तालुक्यात उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवली. वाढते तापमान, कमी होत चाललेले वृक्षावरण, अनियंत्रित विकास आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यामुळे हवामानात लक्षणीय बदल होत असल्याचे तज्ज्ञांकडूनही वारंवार सांगितले जात आहे.पावसाने जरी तात्पुरता दिलासा दिला असला, तरी या बदलत्या वातावरणातून मानवाने कोणता धडा घेतला, हा खरा प्रश्न आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडविण्यास मानवच मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे वास्तव नाकारता येणार नाही. जंगलतोड, वाढते प्रदूषण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अवाजवी वापर आणि पर्यावरण संरक्षणाकडे होणारे दुर्लक्ष याचे परिणाम आता हवामान बदलाच्या स्वरूपात स्पष्टपणे दिसू लागले आहेत.पर्यावरण संवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात आल्या नाहीत, तर येणाऱ्या वर्षांत उन्हाचा पारा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



त्यामुळे केवळ पावसाचा आनंद साजरा करण्यापेक्षा वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.निसर्ग वेळोवेळी इशारे देत असतो.

श्रीवर्धनमध्ये झालेला हा पाऊस शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असली, तरी बदलत्या हवामानाच्या संकटाविषयी समाजाला जागे करणारा एक महत्त्वाचा संदेशही देऊन गेला आहे.

# केंद्रीय मंत्री गडकरींची पाहणी ठरली केवळ औपचारिकता ?

## तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अजूनही ठप्प!

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या रखडलेल्या व अपूर्ण कामाची पाहणी करण्यासाठी मागील महिन्यात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दौरा केला होता.या दौऱ्यानंतर महामार्गाचे रखडलेले काम वेगाने सुरू होईल,अशी अपेक्षा तालुक्यातील सणसर भागातील नागरिकांनी व्यक्त केली होती.मात्र प्रत्यक्षात महिना उलटत यायला लागला तरी कामाच्या ठिकाणी कोणतीही हालचाल दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.पाहणी दरम्यान केंद्रीय मंत्री गडकरी यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत लवकरच काम सुरू होईल,असे आश्वासन दिले होते.त्यांच्या या वक्तव्यानंतर तालुक्यातील जनतेमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते.परंतु आजतागायत परिस्थिती जैसे थेच असल्याने नागरिकांचा विश्वास डळमळीत झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या अपूर्ण कामामुळे वाहनचालक शेतकरी, व्यापारी आणि वारकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. धुळीचे साम्राज्य,खराब रस्ते आणि अपूर्ण सेवा रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून प्रशासन आणि संबंधित यंत्रणा मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे केंद्रीय मंत्र्यांच्या दौऱ्यानंतरही कामाला गती मिळत नसेल तर पाहणीचा नेमका उपयोग काय,असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.फक्त आश्वासनांची खैरात आणि प्रत्यक्षात शून्य कार्यवाही,अशी भावना आता जनमानसात निर्माण होत आहे.दरम्यान,पालखी महामार्गाचे काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठोस पावले उचलावीत,अन्यथा संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थानच्या वेळी सणसर गावातील ग्रामस्थ जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारणार असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे तालुक्यातील काही सामाजिक संघटना व ग्रामस्थांकडून दिला जाणार असल्याची चर्चा सध्या सुरु आहे."दौरा झाला,आश्वासन मिळाले;पण काम कुठे आहे?"हा प्रश्न आता इंदापूर तालुक्यातील नागरिकांच्या चर्चेचा मुख्य विषय बनला आहे.

# वीज जातेय, संयम संपतोय!

## पनवेलकरांचा संताप आता रस्त्यावर येणार?

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी दीपक कोळवणकर** : पनवेल, कामोठे, कळंबोली, उलवे आणि नवीन पनवेल परिसरातील नागरिक सध्या दोन गोष्टींनी हैराण आहेत — एक म्हणजे प्रचंड उकाडा आणि दुसरे म्हणजे महावितरणचा भोंगळ कारभार. ऐन उन्हाळ्यात वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः अंधारात गेले आहे. मात्र या गंभीर प्रश्नाकडे महावितरण प्रशासन किती गांभीर्याने पाहत आहे, हा खरा प्रश्न आहे.

वीज गेली की कारणांची यादी तयार असते. कधी ट्रान्सफॉर्मर ऑईल लिकेज, कधी केबल फॉल्ट, कधी डीपीमधील बिघाड, तर कधी तांत्रिक अडचण. पण नागरिकांचा सरळ प्रश्न आहे — या समस्या दरवर्षी त्याच त्याच का? जर दोष माहिती आहेत तर त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत? की नागरिकांनी फक्त बिले भरायची आणि त्रास सहन करायचा?

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे तक्रार करण्यासाठी नागरिकांनी अधिकाऱ्यांना फोन केला तर अनेकदा फोन उचलले जात नाहीत. मग नागरिकांनी आपली व्यथा कोणाकडे मांडायची? सोशल मीडियावर पोस्ट करायची, व्हिडिओ व्हायरल करायचे आणि आंदोलन करायचे, एवढाच पर्याय उरतो का?

उलवे परिसरातील एका महिलेचा मानसिक त्रासामुळे रडतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि त्यानंतर हा प्रश्न राज्यभर चर्चेत आला. पण प्रश्न असा आहे की एखाद्या नागरिकाला अश्रू ढाळावे लागल्यानंतरच प्रशासन जागे होणार असेल, तर अशा व्यवस्थेचा उपयोग काय?

कामोठे, कळंबोली आणि पनवेलमधील अनेक व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. घरातून काम करणारे कर्मचारी, ऑनलाइन व्यवसाय करणारे युवक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण यांचे हाल कोण मोजणार? वीज नसल्याने व्यवसाय ठप्प होतात, इंटरनेट बंद पडते, उपकरणांचे नुकसान होते आणि मानसिक तणाव वाढतो. या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार?

दरम्यान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या प्रश्नावर आंदोलन करून महावितरणच्या कारभाराचा निषेध केला आहे. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचे स्पष्ट संकेत या आंदोलनातून मिळाले आहेत.

स्थानिक आमदारांनी देखील या विषयावर आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसत आहे. परिस्थिती सुधारली नाही तर पनवेल-सायन महामार्ग रोखण्याचा इशारा दिला गेला आहे. हा इशारा महावितरणसाठी धोक्याची घंटा मानला जात असला तरी नागरिक विचारत आहेत की आंदोलनाची वेळच का यावी? समस्या इतकी गंभीर होईपर्यंत प्रशासन झोपेत होते का?

पनवेल हे देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक मानले जाते. आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, मोठमोठे गृहप्रकल्प आणि स्मार्ट सिटीच्या घोषणा केल्या जात आहेत. पण दुसरीकडे नागरिकांना नियमित वीजपुरवठाही मिळत नसेल तर विकासाच्या या गप्पांचा उपयोग काय?

महावितरणने आता कारणे सांगणे थांबवून उत्तरदायित्व स्वीकारण्याची गरज आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमागील खरी कारणे जाहीर करावीत, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि कायमस्वरूपी उपाययोजनांचा आराखडा नागरिकांसमोर ठेवावा. अन्यथा नागरिकांचा संताप केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहणार नाही.

कारण आता प्रश्न फक्त वीजेचा नाही, तर प्रशासनाच्या विश्वासार्हतेचा आहे. आणि जेव्हा नागरिकांचा विश्वास उडतो, तेव्हा अंधार फक्त घरातच नाही तर व्यवस्थेतही पसरतो.

# भवानीनगरच्या सरस्वती हॉस्पिटलमध्ये मोफत डायलिसिस उपचार सुविधा सुरू

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : भवानीनगर ता.इंदापूर परिसरातील तसेच ग्रामीण भागातील मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांना मोठा दिलासा देणारी मोफत डायलिसिस उपचार सुविधा भवानीनगर येथील सरस्वती हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा शुभारंभ वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला.यावेळी भवानीनगर - सणसर डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.पारस संचेती यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच परिसरातील वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर मान्यवर सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरस्वती हॉस्पिटलचे संचालक डॉ.नंदकिशोर साळुंखे यांनी या उपक्रमामागील सामाजिक



भूमिका स्पष्ट करताना सांगितले की,ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना आर्थिक अडचणींमुळे डायलिसिस उपचार घेणे कठीण होते.मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्यासाठी वेळ,पैसा आणि मानसिक त्रास सहन करावा लागत होता.ही बाब लक्षात घेऊन भवानीनगर परिसरातील गरजू रुग्णांना दर्जेदार आणि वेळेवर उपचार मिळावेत,या सामाजिक हेतूने मोफत डायलिसिस सुविधा सुरू करण्यात आली आहे.

उद्घाटनप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की,आरोग्य सेवा ही समाजासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असून ग्रामीण भागातील गरजू नागरिकांसाठी अशा प्रकारची मोफत सुविधा उपलब्ध करून देणे ही खऱ्या अर्थाने समाजसेवा आहे.डॉ.पारस संचेती यांनी देखील सरस्वती हॉस्पिटलच्या या उपक्रमाचे स्वागत करत,ग्रामीण रुग्णांना त्यांच्या गावाजवळच अत्याधुनिक आणि मोफत उपचार सुविधा उपलब्ध होणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे भवानीनगर व परिसरातील अनेक किडनी रुग्णांना मोठा आधार मिळणार असून आरोग्य क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली असल्याचे जाणवत आहे.

# नेमबाजीत रायगडचा डंका

## सिद्धांत शूटिंग क्लबचे २१मेंबर राज्यस्तरीय चॅम्पियनशिप साठी सज्ज!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : महाराष्ट्र रायफल संघटना मान्यता प्राप्त सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगडच्या २१ अष्टपैलू नेमबाजांची २९ व्या कॅप्टन एस जे एजिकल मेमोरियल शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे ४ जून ते९ जून २०२६ दरम्यान वरली मुंबई येथील महाराष्ट्र रायफल संघटनेच्या शूटिंग रेंजवर ही मानाची स्पर्धा पार पडत असून यात हे खेळाडू रायगड जिल्ह्याचे नाव उंचावण्यासाठी सज्ज झाले आहेत. या राज्यस्तरीय चॅम्पियनशिप मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नेमबाजांना ऑल इंडिया राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे अधिकृत प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

या स्पर्धेत पिस्तूल आणि रायफल अशा दोन्ही क्रीडा प्रकारांमध्ये रायगडच्या पुढील खेळाडूंची निवड झाली आहे प्रीतम पाटील, महेश फुलोरे, संदेश थळे, अब्दुल रहीम शेख, डॉ.विलास मानकर, गौरव केसर, सदानंद म्हालेटकर, करण बेहेरे ,सचिन कुमार, मानस कणवाजे ,मिलिंद पांचाळ, पार्थ तोडकर, सिद्धेश पवळे ,दिग्विजय चौगुले ,पाषान मानकेशा ,सुमेध गावडे, मनीषा गुप्ता ,अस्मिता झा ,खुषी गुप्ता, आणि वरा देवळेकर.

**" रायगड नवी मुंबई आणि ठाणे यासह विविध जिल्ह्यांमध्ये अत्याधुनिक शूटिंग रेंज उभारण्याचा आमचा मानस आहे याद्वारे सर्व वयोगटातील मुले मुलींना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देऊन देशासाठी ऑलिम्पिक दर्जाचे नेमबाज घडवणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे" (किशन खारके सेक्रेटरी सिद्धांत शूटिंग क्लब)**

या सर्व खेळाडूंनी क्लबचे सेक्रेटरी व मुख्य प्रशिक्षक रायगड भूषण पुरस्कार विजेते विख्यात राष्ट्रीय नेमबाज किशन खारके तसेच राष्ट्रीय नेमबाज व आय एस एस एफ प्रमाणित कोच अलंकार कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र सराव केला आहे इंडियन मॉडेल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज उलवा, चिरनेर यासारख्या आधुनिक रेंजवर या खेळाडूने आपले कौशल्य घासून गुळगुळीत केले आहे.प्रशिक्षकांच्या उच्च दर्जाच्या कामगिरीमुळे आणि दर्जेदार सोयी सुविधांमुळे सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लबचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात गाजत आहे. आज केवळ रायगड नव्हे तर जिल्ह्यातील नवोदित नेमबाज या प्रशिक्षणासाठी गर्दी करत आहेत.

# ॲट्रॉसिटीसह विनयभंगाचा गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 34 वर्षीय महिलेसोबत जातीवाचक शब्द वापरून तिला जबरदस्तीने जवळ ओढून किस घेतल्याप्रकरणी आरोपी सुदर्शन देशमुख यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आठ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी सुदर्शन देशमुख याने 34 वर्षीय पीडित महिलेला जातीवाचक अपशब्द वापरून त्यांच्याशी जवळच साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी पीडितेने नकार दिला असता त्या घरी जात असताना त्याने त्याची गाडी थांबवली आणि त्यांना गाडीमध्ये बसवून जबरदस्तीने जवळ ओढल्या आणि गालावर किस घेऊन विनयभंग केला. हा प्रकार फेब्रुवारी ते मार्च यादरम्यान घडला. या प्रकारामुळे पीडित महिला मानसिक तणावात होती. पुढे काय करावे हे समजत नसल्याने तिने आठ जून रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# पनवेलमध्ये महानगर गॅसच्या खोदकामामुळे नागरिकांच्या जीवितास धोका; रस्ते दुरुस्तीबाबत प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिका हद्दीत सध्या महानगर गॅसच्या पाईपलाईन टाकण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यासाठी विविध ठिकाणी रस्त्यांचे खोदकाम करण्यात येत आहे. विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वीच लाखो रुपयांचा खर्च करून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र आता पुन्हा त्याच रस्त्यांचे खोदकाम करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर खड्ड्यांमध्ये केवळ माती टाकून वरून खडी पसरवली जात आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या सायकलस्वार, दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी खडी सैल झाल्याने वाहने घसरत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.महानगर गॅस कंपनीने रस्ते खोदकामासाठी तसेच रस्त्यांच्या पुनर्बांधणीसाठी महापालिकेकडे कोट्यवधी रुपयांची रक्कम जमा केल्याची चर्चा आहे. मात्र प्रत्यक्षात रस्ते पूर्ववत व सुरक्षित स्थितीत आणण्याबाबत गंभीर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.यासोबतच पनवेल महापालिकेच्या अभियांत्रिकी विभागाच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. रस्त्यांच्या निकृष्ट दुरुस्तीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. "महानगर गॅस कंपनी आणि महापालिकेवर नेमका कोणाचा वरदहस्त आहे?" असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असून अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या दुरुस्तीमुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. पावसामुळे माती वाहून जाऊन खड्डे अधिक खोल होऊ शकतात, तसेच खडी रस्त्यावर पसरल्याने अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेने तातडीने हस्तक्षेप करून महानगर गॅस कंपनीकडून सर्व खोदलेले रस्ते दर्जेदार पद्धतीने पूर्ववत करून घ्यावेत, अन्यथा भविष्यात होणाऱ्या अपघातांची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित केला आहे.

**संपादकीय टिप्पणी :** विकासकामे आवश्यक असली तरी ती करताना नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाने वेळेत योग्य उपाययोजना केल्या नाहीत तर एखादी गंभीर दुर्घटना घडल्याशिवाय जाग येणार नाही, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# पीएम-किसान लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य

## ३० जूनपूर्वी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी ३० जून २०२६ पूर्वी वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन निफाडचे तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांनी केले आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पीएम-किसान योजनेत पारदर्शकता वाढविणे तसेच केवळ पात्र व जिवंत लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ मिळावा यासाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व लाभार्थी शेतकऱ्यांनी विहित मुदतीत प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

शेतकरी आपल्या नजीकच्या सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) केंद्रावर बायोमेट्रिक पद्धतीने अथवा पीएम-किसान मोबाईल ॲपद्वारे फेस ऑथेंटिकेशनच्या माध्यमातून ई-केवायसी करू शकतात. याशिवाय ग्रामस्तरीय नोडल अधिकारी आणि कृषी विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या मदतीनेही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.ई-केवायसी न केल्यास पीएम-किसान योजनेचा पुढील हप्ता मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे निफाड तालुक्यातील सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी ई-केवायसी करून शासनाच्या योजनेचा लाभ अखंडितपणे मिळवावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांनी केले आहे.

# विंचूरच्या कन्येची राज्यस्तरावर चमक; पल्लवी निकमच्या कामगिरीने नाशिकचा मान उंचावला

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे नुकत्याच पार पडलेल्या २४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर (यू-१९) टेनिस बॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत नाशिक जिल्ह्याच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राज्यात उपविजेतेपद पटकावले. या यशामध्ये विंचूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. पल्लवी सोमनाथ निकम हिने अष्टपैलू कामगिरी करत विशेष छाप पाडली.

टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र आणि टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत राज्यभरातील संघ सहभागी झाले होते. नाशिकच्या मुलींच्या संघाने साखळी फेरीपासूनच दमदार खेळ करत बाद फेरीतील सामने जिंकले आणि अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. अंतिम सामन्यातही संघाने चांगली झुंज देत राज्यातील उपविजेतेपदाचा मान मिळविला.

संघातील अष्टपैलू खेळाडू म्हणून पल्लवी निकम हिने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत उल्लेखनीय कामगिरी केली. तिच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी खेळामुळे संघाला अनेक निर्णायक क्षणी बळ मिळाले. पल्लवीच्या या यशामुळे विंचूरसह निफाड तालुका आणि संपूर्ण नाशिक जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.



पल्लवीच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राजेंद्र चांदे, जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष जगदीश जेऊघाले, उपाध्यक्ष कैलास शेठ सोनवणे, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजाभाऊ गोरे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे, उपप्राचार्य वाबळे सर, पर्यवेक्षक ठाकरे सर व माळी सर, विभागप्रमुख राजेंद्र टिळेकर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, पत्रकार संघ आणि माजी विद्यार्थी संघटनांनीही तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

नाशिक जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव मुकुंद झनकर यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रशिक्षक प्रदीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने ही उल्लेखनीय कामगिरी केली. पल्लवी निकमच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी नवी प्रेरणा निर्माण झाली असून, तिच्या भविष्यातील राष्ट्रीय स्तरावरील वाटचालीबाबत सर्वत्र आशावाद व्यक्त केला जात आहे.

# महागाव तालुक्यात अवैध दारूविरोधात पोलिसांचा एल्गार

## देशी दारूची दुकाने, हातभट्ट्या उद्ध्वस्त; जवळपास २० ठिकाणी धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**( यवतमाळ) एम डी सुरोशे :** गेल्या काही काळापासून महागाव तालुक्यात अवैध दारू विक्री, हातभट्ट्यांद्वारे मद्यनिर्मिती आणि बेकायदेशीर मद्यव्यवसाय वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर महागाव पोलिसांनी कठोर भूमिका घेत तालुकाभर विशेष मोहीम राबवत अवैध दारूविरोधात जोरदार एल्गार पुकारला आहे. या मोहिमेअंतर्गत विविध गावांमध्ये छापेमारी करून देशी दारूची दुकाने, हातभट्ट्या आणि मद्यनिर्मितीची केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली असून आतापर्यंत जवळपास २० ठिकाणी प्रभावी कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांच्या या धडक मोहिमेमुळे अवैध धंदेवाल्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अनेकांनी आपले बेकायदेशीर व्यवहार बंद करण्यास सुरुवात केल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. छापेमारीदरम्यान मोठ्या प्रमाणात तयार मद्य, कच्चा सडवा, गुळ, रसायने तसेच मद्यनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. अनेक ठिकाणी गुन्हे दाखल करून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अवैध दारूचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील कुटुंबांना बसत असल्याचे चित्र आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटत असून महिलांवर आणि मुलांवर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे अनेक गावांमधील महिला, सामाजिक संघटना आणि ग्रामस्थांनी अवैध दारूविरोधात पोलिसांकडे तक्रारी नोंदविल्या



होत्या. या जनभावनेची दखल घेत महागाव पोलिसांनी राबविलेली ही मोहीम नागरिकांसाठी दिलासादायक ठरत आहे.विशेष म्हणजे, केवळ कारवाई करून थांबण्याऐवजी पोलिसांकडून जनजागृतीवरही भर दिला जात आहे. अवैध दारूविरोधात नागरिकांनी पुढाकार घ्यावा, संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी आणि व्यसनमुक्त समाज उभारण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.महागाव तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, युवकांना व्यसनाच्या विळख्यातून वाचवणे आणि सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवणे या उद्देशाने ही मोहीम पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत पोलिस प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.अवैध दारू व्यवसायाविरोधातील या निर्णायक कारवाईमुळे तालुक्यात सकारात्मक संदेश गेला असून, ग्रामीण भागातील नागरिकांनी पोलिसांच्या या धाडसी आणि जनहिताच्या उपक्रमाचे स्वागत केले आहे. "अवैध धंद्यांना थारा नाही" हा स्पष्ट संदेश या मोहिमेतून दिला गेल्याने तालुक्यातील बेकायदेशीर व्यवसायांवर मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वाढवण बंदर प्रकल्पामुळे तब्बल दहा लाखांपेक्षा जास्त रोजगार संधी प्राप्त होणार

## रवींद्र चव्हाण यांचे भारत लीडरशिप समिटमध्ये आश्वासक वक्तव्य

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/मुंबई :** लोकशाही मराठी या वृत्तवाहिनीच्या माध्यमातून नुकताच मुंबईतल्या अंधेरी येथे "भारत लीडरशिप समिट" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह राजकीय सामाजिक आणि मनोरंजन वर्तुळातील अनेक दिग्गजांची उपस्थिती लाभली.६ जून रोजी अंधेरी पूर्व येथील कोर्ट यार्ड बाय मॅरीएट येथे या शानदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते."सन्मान गुणवंतांचा संवाद महाराष्ट्राच्या उज्वल भविष्याचा" या संकल्पनेवर आधारित या समिटमध्ये अनेक महत्त्वाचे विषय मांडले गेले.

महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन आणि राज्य व देश हिताच्या विषयांवर राजकीय नेत्यांनी या कार्यक्रमात सखोल चर्चा केली. यामध्ये मंत्री प्रताप सरनाईक रवींद्र चव्हाण आणि युवा नेते सिद्धेश कदम यांच्यातील चर्चा चांगल्याच रंगल्या. विविध क्षेत्रांत



उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि सामाजिक कार्यकर्त्यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात लोकशाही समूह नवीन इंग्रजी वृत्तवाहिनी लॉन्च करत असण्याची घोषणा करण्यात आली. लोकशाही इंग्लिश या नावाने लवकरच इंग्रजी वृत्तवाहिनी कार्यान्वित होणार आहे.

भारत लीडरशिप समिटमध्ये आपले विचार मांडताना भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वाढवण बंदर प्रकल्प उभारणी बाबत अत्यंत सूचक आणि महत्त्वाचे विधान केले. आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की महाराष्ट्र राज्याला तब्बल ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. सध्या या ठिकाणी मुंबई आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण यांचे माध्यमातून बंदरे कार्यान्वित असली तरी देखील त्यांच्या मर्यादा ध्यानात घेता या ठिकाणी जागतिक स्तरावरील बंदराची निर्मिती झाली पाहिजे अशी सर्वांचीच धारणा होती. परंतु आमच्या अगोदरच्या सरकारांनी फक्त विचार केला, त्याला मूर्त आणि वास्तव स्वरूप दिले ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच. तब्बल ७२ हजार २२० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून वाढवण बंदर उभे राहत आहे. ज्याप्रमाणे जे एन पी ए नजीक नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित झाले आहे तशाच पद्धतीने वाढवण बंदरा नजीक देखील विमानतळ कार्यान्वित करण्याचे व्हिजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आहे.

वाढवण बंदर कार्यान्वित झाल्यानंतर दहा लाखांपेक्षा जास्त रोजगार संधी या ठिकाणी उपलब्ध होणार आहेत भारतात २० मीटर खोली असलेल्या बंदराचा अभाव असल्याने मालवाहू जहाजांना प्रथम कोलंबो (१५ मीटर खोल) किंवा सिंगापूर (१२ मीटर) या बंदरावर माल उतरावा लागतो. जो नंतर लहान मालवाहू जहाजातून जेएनपीटी (११ मीटर खोली)सारख्या भारतीय बंदरांवर येतो. आपला आयात-निर्यातीचा ९०% माल समुद्रमार्गे जात असल्याने आयातदार व निर्यातदारांना मोठी गैरसोय सहन करावी लागते. यासाठी भारताला पश्चिम किनाऱ्यावर २० मीटर खोलीचे बंदर झाल्यास मालवाहतूक वाढेल. कंटेनर जहाजांचा वाढता आकार असल्यामुळे भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर खोल कंटेनर पोर्ट विकसित होणेही अत्यावश्यक आहे. वाढवण किनाऱ्याजवळ जवळपास २० मीटरची नैसर्गिक खोली आहे, ज्यामुळे बंदरावर मोठ्या जहाजांना हाताळणे शक्य होईल. या बंदराच्या विकासामुळे १६०००-२५००० टीईयू क्षमतेच्या कंटेनर जहाजांची वाहतुकीसाठी कॉलिंग सक्षम झाल्याने मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थेचा फायदा होऊन इतर खर्च कमी होईल.

या समिटमध्ये लोकप्रिय अभिनेते अभिजीत खांडकेकर हे देखील सहभागी झाले होते तसेच मर्दिनी या मराठी चित्रपटाची टीम देखील सहभागी झाली होती आणि त्यांनी निवोदितांना संधी व अभिनयातील आव्हानांवर आपले विचार मांडले.

# पावसाळा तोंडावर; गटार अडवून रस्ता रुंदीकरणाचा प्रकार, कायदा फक्त सामान्यांसाठीच का?

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** पावसाळा जवळ येताच श्रीवर्धन नगरपालिकेच्या हद्दीत स्वच्छता, नालेसफाई आणि पावसाळ्यापूर्वीच्या विविध कामांना वेग आला आहे. दरवर्षीप्रमाणे घरबांधणी, हॉटेल किंवा इतर बांधकामे सुरू असलेल्या ठिकाणी गटारे, रस्ते आणि सार्वजनिक जागांमध्ये टाकलेली रेती, खडी, विटा व अन्य साहित्य तात्काळ हटविण्याचे आवाहन नगरपालिकेकडून करण्यात येते. नियमांचे पालन न केल्यास संबंधित साहित्य जप्त करण्याची कारवाईही केली जाईल अशी दवंडी दिली जाते.

मात्र श्रीवर्धनमधील काही परिसरात याच्या अगदी विरुद्ध चित्र पाहायला



मिळत असून, कायदा फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहे का? असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील एका धनाढ्य व्यावसायिकाच्या हॉटेल व रिसॉर्टचे बांधकाम सुरू असून बांधकाम साहित्य आणि मोठ्या वाहनांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी चक्क गटारामध्ये दगड, माती व इतर साहित्य टाकून रस्त्याची रुंदी वाढविण्यात आली आहे. विशेष म्हणजे पावसाळा सुरू होऊनही हे अडथळे अद्याप हटविण्यात आलेले नाहीत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ज्या ठिकाणी गटार अडविण्यात आले आहे त्या भागातून पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात वाहते. गटाराचा नैसर्गिक प्रवाह रोखल्यामुळे मुसळधार पावसात पाणी रस्त्यावर येण्याची आणि नागरिकांना त्रास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तरीदेखील संबंधित हॉटेल व्यावसायिकाने याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे.

एकीकडे सामान्य नागरिकांना नियमांचे पालन करण्यासाठी नोटिसा आणि कारवाईचा इशारा दिला जातो, तर दुसरीकडे प्रभावशाली व्यक्तींवर त्याच नियमांची अंमलबजावणी होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे आता पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गटार अडविण्याच्या या प्रकाराची श्रीवर्धन नगरपालिका दखल घेणार का? संबंधितांवर कारवाई होणार का? की हा प्रकारही दुर्लक्षित राहणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले असून नगरपालिकेची भूमिका काय राहते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.नियम सर्वांसाठी समान असतात, मग त्यांची अंमलबजावणीही सर्वांवर समान होणार का? हा प्रश्न सध्या श्रीवर्धनकरांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

# मालडुंगे धोदानी परिसरात बेकायदेशीर वृक्ष तोड ; वनपाल व कर्मचारी यांच्या अर्थ संबंधातून वृक्ष तोडीवर दुर्लक्ष

## वनपरीक्षेत्र अधिकारी श्री. पानपट्टे यांना पत्र देऊनही कारवाई नाही?

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/ प्रतिनिधी :** पनवेल शहराचा वाढता विकास पाहता ग्रामीण भागातही प्रचंड प्रमाणात औद्योगिक व व्यवसायिक विकास होतांना दिसत आहेत. नेरे परिसरात विशेषतः वाजे, गाढेश्वर, धामणी, देहरंग, वाघाचीवाडी, धोदानी व मालडुंगे परिसरात खूप प्रमाणात व्यवसायिक फार्म हाऊस, बंगलो, रिसॉर्ट तयार करत असतांना सपाटीकरण करण्याच्या नावाने अनेक वृक्ष्यांची बेकायदेशीर कत्तल केली जाते. वन विभागातील वनपाल, वनरक्षक यांच्या अर्थ संबंधातूनच याचा परिणाम हळूहळू पर्यावरणाचा ऱ्हास होतांना दिसत आहे. या वाढत्या वृक्ष तोडीमुळे वन्य प्राणी व जीवजंतूचा देखील विनाश होऊ शकतो. या वृक्ष तोडी संदर्भात अनेकदा स्थानिक ग्रामस्थांनी वनपाल, वनरक्षक यांना सांगितले, मात्र आर्थिक संबंधामुळे उडवा उडवीचे उत्तरे



देऊन फार्म हाऊस, बंगलो, रिसॉर्ट या व्यवसायिक मालकांची जमेची बाजू घेतांना दिसतात.

याबाबत पनवेलचे वनविभागातील वनपरीक्षेत्र अधिकारी श्री. पानपट्टे यांना ग्राम विकास संघर्ष समितीच्या माध्यमातून गणपत वारगडा यांनी दोन महिने पूर्वी लेखी पत्र देऊनही अद्याप कारवाई झाली नाही. त्यामुळे तालुक्यातील वृक्ष व पर्यावरणाचा संगोपन करणारे व झाडे लावा, झाडे जगवा सांगणारे वनपरीक्षेत्र अधिकारी श्री. पानपट्टे हे सुद्धा वनपाल व वनरक्षका प्रमाणे आर्थिक संबंधात अडकले आहेत की काय? असा प्रश्न येथील स्थानिकांना पडला आहे.

# २६ बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : तालुक्यातील दुर्गम भागातील रामपूर वाडी,न्हावी तांडा,निंबायती, पिंपरी रामपूर तांडा, येथील अंगणवाडी तील बालकाची आरोग्य तपासणी करून यातील २६ बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या आरोग्य तपासणी शिबिरात.पाच गावांतील अंगणवाडीतील बालकाची आरोग्य तपासणी करण्यात आली.या उपक्रमाचे संयोजक संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे




यांनी हा उपक्रम सुरू केला असून्य बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात येते आज वैद्यकीय अधिकारी डॉ खालिद झाकी व डॉ पठाण यांनी बालकाची आरोग्य तपासणी केली.या प्रसंगी अंगणवाडी सेविका नंदाबाई दांडगे,वंदना बाई चव्हाण,कुशावर्त बाई, रंजना जाधव, मीरा मोरे यांच्यासह मदतनीस उपस्थित होते.

# पीएम स्वनिधी' योजनेचा विशेष मेळावा; मुरमाडी (सा) येथील लघु व्यावसायिकांना सुवर्णसंधी

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पी. एम स्वनिधी )' योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी २४ जून २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, लाखनी येथे विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुरमाडी (सा) येथील छोटे व्यावसायिक, हातगाडी चालक, फेरीवाले व पथविक्रेत्यांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोरोना महामारीनंतर आर्थिक अडचणीत सापडलेल्या रस्त्यावरील विक्रेते आणि छोट्या उद्योजकांना आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारने ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. मेळाव्यात लाभार्थ्यांना योजनेची सविस्तर माहिती, आवश्यक कागदपत्रांची तपासणी तसेच थेट अर्ज नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात विनातारण १५ हजार रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होते. या कर्जाची नियमित परतफेड केल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात २५ हजार रुपये आणि त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात तब्बल ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते.

विशेष म्हणजे, कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना सरकारकडून ७ टक्के व्याज अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी फोनपे, गुगलपे अथवा क्यूआर कोडद्वारे व्यवहार करणाऱ्या लाभार्थ्यांना वर्षाला १,२०० ते १,६०० रुपयांपर्यंत कॅशबॅकचा लाभही मिळतो.

मेळाव्यास उपस्थित राहताना आधार कार्ड (मोबाईल क्रमांकाशी लिंक असलेले), बँक पासबुक आणि मतदार ओळखपत्र ही कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

मुरमाडी (सा) येथील सर्व पात्र नागरिक, छोटे व्यापारी आणि फेरीवाल्यांनी या संधीचा लाभ घेत आत्मनिर्भरतेच्या दिशेने पाऊल टाकावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पनवेल येथे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेशाकरिता अर्ज सादर करावेत

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, ग्रीन पार्क सोसायटी समोर सेक्टर 10, प्लॉट नंबर 21 कळंबोली, पनवेल येथे कार्यरत आहे. या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाकरिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छूक विद्यार्थीनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे या वसतिगृहामध्ये इ.8 वी पासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनु.जाती 85 टक्के, अनु.जमाती 3 टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती 5 टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील विद्यार्थीनी 5 टक्के व विशेष मागास प्रवर्ग 2 टक्के यांना गुणवत्तेनसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनीकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा-दररोज पोहे/शिरा/उपीट इ. पैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दुध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी/उसळ, लोणचे पापड इ.सह आठवडयातून दोन वेळा मांसाहार) देण्यात येते. अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामूल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा 1 हजार 150 निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेश पात्र महा. विद्यार्थीनींना दोन संचाकरिता गणवेश भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त रेनकोट, छत्री भत्ता, संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडा साहित्य, मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आईचे छत्र हरपले, तरी जिद्दीने गाठले ध्येय

## भराडीच्या शुभम मनगटेची सैन्यदलात निवड

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील रहिवासी असलेल्या शुभम विठ्ठल मनगटे याने आपल्या कष्टाच्या जोरावर भारतीय सैन्यदलात निवड होऊन कुटुंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सात वर्षांपूर्वी सर्पदंशाने आई वैशाली मनगटे यांचे निधन झाले. आई ही कुटुंबाचा आधार होती, परंतु या दुर्दैवी संकटानंतरही वडिलांच्या, काकांच्या आणि काकूंच्या भक्कम पाठिंब्यावर शुभमने जिद्दीने आपला प्रवास सुरू ठेवला.



**मनगटे कुटुंबाची जिद्द: बहीण-भावाचा दुहेरी विजय**

**आईच्या निधनानंतर खचून न जाता मनगटे कुटुंबातील भावंडांनी स्वतःचे भविष्य घडवले आहे. दोन वर्षांपूर्वी शुभमची बहीण भारती मनगटे हिने अमरावती पोलीस दलात 'खाकी' मिळवून कुटुंबाला आधार दिला होता. आता शुभमने सैन्यदलात निवड होऊन 'वर्दी' मिळविली आहे. मनगटे कुटुंबाच्या संघर्षाचे आणि या दुहेरी यशाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने यश कसे मिळवावे, याचे हे भावंड आदर्श ठरले आहेत.**

शुभमने शेती कामात वडिलांना मदत करत असतानाच शिक्षण आणि शारीरिक कसरतीचे सातत्य ठेवले. या यशाबद्दल श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाच्या 'ज्ञानविकास विद्यालय, भराडी'तर्फे शुभमचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विठ्ठल मनगटे, भगवान मनगटे, वैभव मनगटे, कुशल देशमुख यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते 'हंगर फ्री वर्ल्ड' उपक्रमाचे उद्घाटन

## मलाबार ग्रुप केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज मोफत पौष्टिक जेवण उपलब्ध करून देणार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,प्रतिनिधी** : केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री पीयूष गोयल यांनी मुंबईतील कांदिवली पूर्व येथील अटल बिहारी वाजपेयी कौशल्य विकास केंद्र (ABVKVK) येथे मलाबार ग्रुपच्या 'हंगर फ्री वर्ल्ड' उपक्रमाचे उद्घाटन केले. हा उपक्रम युवकांच्या शिक्षण, कौशल्य विकास आणि भविष्यातील रोजगार संधींना बळकटी देण्यासाठी पोषणाच्या महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करतो. या उपक्रमाअंतर्गत, मलाबार ग्रुप केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज १०० पौष्टिक जेवण उपलब्ध करून देणार आहे. यामुळे त्यांच्या आरोग्य आणि कल्याणाला आधार मिळेल तसेच ते व्यावसायिक प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, करिअर विकास आणि भविष्यातील रोजगार संधींवर अधिक चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करू शकतील.

हा उपक्रम मलाबार ग्रुपच्या हंगर




फ्री वर्ल्ड कार्यक्रमाचा एक भाग आहे, जो समूहाच्या प्रमुख कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांपैकी एक असून, भूक निर्मूलन आणि वंचित समुदायांना पोषणाची उपलब्धता वाढविण्यावर केंद्रित आहे. हंगर फ्री वर्ल्ड सध्या भारतासह विविध आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये दररोज एक लाखाहून अधिक जेवणांचे वितरण करते, जे भूक निर्मूलन आणि समाजकल्याणासाठी समूहाची सातत्यपूर्ण बांधिलकी दर्शवते.समूहाने नुकतीच आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ₹२०० कोटींच्या CSR निधीची घोषणा केली आहे.

श्री पीयूष गोयल, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री म्हणाले,"युवकांना सक्षम बनविण्यासाठी आणि त्यांना अर्थपूर्ण रोजगारासाठी तयार करण्यासाठी कौशल्य विकासाची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. पोषणासारख्या मूलभूत गरजांद्वारे विद्यार्थ्यांना आधार देणारे उपक्रम त्यांना शिक्षण आणि वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करण्यास मोठी मदत करू शकतात. अशा प्रकारचे सहकार्यपूर्ण प्रयत्न युवक विकास आणि रोजगारक्षमता वाढविणाऱ्या सक्षम परिसंस्थेच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देतात."

एम.पी.अहमद, अध्यक्ष, मलाबार ग्रुप म्हणाले,"पोषण आणि शिक्षण यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. सक्षम शिक्षण व्यवस्थेसाठी दर्जेदार प्रशिक्षणासाठी पुरेशा पोषणाची उपलब्धताही आवश्यक आहे. 'हंगर फ्री वर्ल्ड' च्या माध्यमातून आम्ही ही मूलभूत गरज पूर्ण करण्याचा आणि व्यक्तींना आत्मनिर्भरता व आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने त्यांच्या प्रवासात मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. अशा प्रकारचे उपक्रम पोषण, कौशल्य विकास आणि सामुदायिक सहकार्य यांच्या माध्यमातून युवकांसाठी अर्थपूर्ण संधी निर्माण करू शकतात आणि दीर्घकालीन सामाजिक विकासाला चालना देऊ शकतात."

श्री पीयूष गोयल यांच्या दूरदृष्टीतून स्थापन करण्यात आलेले अटल बिहारी वाजपेयी कौशल्य विकास केंद्र हे युवकांसाठी एक महत्त्वपूर्ण कौशल्य विकास केंद्र म्हणून कार्यरत आहे. हे केंद्र व्यावसायिक प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, करिअर मार्गदर्शन आणि रोजगार सहाय्य उपलब्ध करून देत असून युवकांची रोजगारक्षमता वाढविण्यास आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यास मदत करते.

# निफाडमध्ये बिबट्यांचा वाढता वावर;

## खडकमाळेगावात तीन दिवसांत दुसरी बिबट मादी जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे** : निफाड तालुक्यातील खडकमाळेगाव परिसरात बिबट्यांचा वाढता वावर चिंतेचा विषय ठरत असून अवघ्या तीन दिवसांच्या कालावधीत दुसरी बिबट मादी वन विभागाच्या जाळ्यात अडकली आहे. त्यामुळे परिसरात पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी ५ जून रोजी खडकमाळेगाव येथील एका पॉलिहाऊसमध्ये शिरलेल्या बिबट मादीला वन विभाग आणि निफाड बचाव पथकाने सुरक्षितपणे पकडून वनउद्यानात हलविले होते. त्यानंतर सोमवारी (दि. ८ जून) रामेश्वर शंकर शिंदे यांच्या गट क्रमांक ७३१/३ मधील कांदा चाळीच्या जाळीत आणखी एक बिबट मादी अडकलेली आढळून आली.

घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ आणि वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड बचाव पथक तातडीने घटनास्थळी



दाखल झाले. ज्ञानेश्वर पवार, सादिक शेख, वैभव दौंड, विजय माळी, काशिनाथ माळी, शरद चांदोरे, सागर दुसिंग आणि भारत माळी यांनी बचाव मोहीम राबवत बिबट मादीला सुरक्षितरीत्या जेरबंद केले. या मोहिमेस निफाड आधुनिक बचाव पथक आणि नाशिक वन्यजीव बचाव पथकाचेही सहकार्य लाभले.

दरम्यान, घटनास्थळापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील टाकळी विंचूर येथे संतोष सयाजी काळे यांच्या द्राक्षबाग परिसरात एका बिबट्याने दोन व्यक्तींवर हल्ला करून त्यांना किरकोळ जखमी केले. त्यानंतर संबंधित बिबट्यालाही जाळीच्या सहाय्याने पकडून रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी करण्यात आले.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा देशमुख यांच्या देखरेखीखाली दोन्ही बिबट माद्यांवर वैद्यकीय उपचार करण्यात आले. पकडण्यात आलेल्या दोन्ही बिबट माद्यांचे वय अंदाजे दोन ते अडीच वर्षे असल्याची माहिती वन विभागाने दिली.

दोन्ही बिबट माद्यांना निफाड वनउद्यानात हलविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

सलग दोन घटनांमुळे खडकमाळेगाव व परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून वन विभागाने नागरिकांना

# खालापुर तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे यांनी जेष्ठ शिवसैनिकांचा केला भव्य सन्मान सोहळा

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त खालापूर तालुक्यात आयोजित करण्यात आलेला ज्येष्ठ आणि निष्ठावंत शिवसैनिकांचा भव्य सन्मान मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.खोपोली येथील महाराजा मंगल कार्यालयात झालेल्या या सोहळ्यात अनेक दशकांपासून शिवसेनेशी एकनिष्ठ राहून पक्षवाढीसाठी योगदान देणाऱ्या शेकडो ज्येष्ठ शिवसैनिकांचा शाल, श्रीफळ, बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या वृक्षारोपणाच्या रोपाने सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यावेळी सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले होते. आपल्या आयुष्याची अनेक वर्षे शिवसेनेच्या विचारांसाठी आणि संघटन उभारणीसाठी वाहून घेतलेल्या ज्येष्ठ शिवसैनिकांचा गौरव होत असताना



उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना मानवंदना दिली.या कार्यक्रमाला शिवसेना नेते माजी मुंबई महापौर किशोरी पेडणेकर, शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, माजी आमदार मनोहर भोईर, उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, नविन चंद्र घाटवळ,सरपंच अविनाश आमले,महेश पाटील ,महिला संघटिका सुवर्णा जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी संघटन मजबूत करण्यासाठी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले. "आपण पहिला आमदार निवडून दिला, त्यानंतर काय घडलं हे सर्वांना माहिती आहे. आज घोडेबाजाराच्या राजकारणाच्या काळातही इतक्या मोठ्या संख्येने निष्ठावंत शिवसैनिकांचा मेळावा होत आहे, याला माझा सलाम," अशा शब्दांत त्यांनी शिवसैनिकांच्या निष्ठेचे कौतुक केले.मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा जागर करत शिवसेना संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच ज्येष्ठ शिवसैनिकांचे योगदान हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी महोत्सव, जागतिक पर्यावरण दिन आणि खालापूर तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त अश्या त्रीवेणी संगमाचा योग साधत भव्य सन्मान सोहळा आयोजित या कार्यक्रमाला शिवसैनिक, युवासैनिक आणि महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# लग्नाच्या तागाद्यावरून महिलेची केली हत्या, आरोपीला दोन महिन्यांनी केली अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी:** तब्बल दोन महिन्यांपूर्वी सापडलेल्या मृतदेहाची ओळख पटवून आरोपीला अटक करण्यात पनवेल तालुका पोलिसांना यश आले आहे. करण नामदेव पाटील (राहणार फडके पाडा, शिळफाटा ठाणे) असे आरोपीचे नाव आहे.11 एप्रिल रोजी पनवेल तालुका पोलिसांना चिंचवली जवळील पनवेल दुन्द्रे रस्त्याच्या वनविभागाच्या जागेत झुडपामध्ये एका अनोळखी महिलेचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू केले. या महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली. आजूबाजूच्या गावांमध्ये जाऊन शोध घेतला. मात्र तिची ओळख पटली नाही. पोलिसांनी तब्बल 200 पेक्षा अधिक मिसिंग महिलांची पडताळणी केली. त्यासोबत पोलिसांचा तांत्रिक तपास सुरू केला. यावेळी हत्या झालेल्या महिलेच्या वर्णनासोबत एका महिलेची माहिती प्राप्त झाली आणि पोलिसांनी त्यानुसार आपला तपास सुरू केला. यावेळी शीळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनिता देवी भगवान राजभर (वय 30) या महिलेची ओळख पटली. तालुका पोलिसांनी या महिलेच्या संपर्कात असलेल्या इसमाला ताब्यात घेतले. त्याचा मोबाईल फोन बाबत तपास केला असता तो मयत महिलेचे संपर्कात असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याच्याकडे तपास केला असता या अनिता देवी राजभर या महिलेने त्याच्यासोबत लग्नाचा तगादा लावला होता आणि त्याला तिच्यासोबत लग्न करायचे नसल्याने करण पाटील याने 6 एप्रिल रोजी तिच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह कारमधून चिंचवली गावचे हद्दीत आणून कार मधील पेट्रोल काढले आणि ते तिच्या प्रेतावर टाकून तिला जाळून टाकले.

# पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या जमिनीचा प्रश्न सुटला

## संघर्ष संपला आणि महादेव भक्तांचा विजय झाला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**डोंबिवली (ठाणे) :** महसूल आणि उद्योग विभागाच्या सकारात्मक सहकार्यामुळे पिंपळेश्वर महादेव मंदिराचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आज अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की, पिंपळेश्वर महादेवाच्या मंदिरासाठी सुरू असलेल्या एका प्रदीर्घ संघर्षाला पूर्णविराम मिळाला असून यात सर्व महादेव भक्तांचा विजय झाला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार दि.८जून रोजी डोंबिवली येथील पिंपळेश्वर मंदिर येथे केले. ही सर्व जमीन आता पिंपळेश्वर महादेवाला समर्पित करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.यावेळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, आमदार सुलभा गायकवाड, आमदार राजेश मोरे, माजी खासदार कपिल पाटील, माजी कॅबिनेट मंत्री जगन्नाथ पाटील, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल,पिंपळेश्वर मंदिराचे विश्वस्त (ट्रस्टी) आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंदिरामध्ये विधीवत महापूजा करण्यात आली. याप्रसंगी भक्त मंडळाच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन




करून सर्वांचे मनापासून आभार व्यक्त केले. आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व मंत्रिमंडळातील आमच्या सर्व सहकाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आणि सहकार्यामुळे हे पवित्र कार्य पूर्ण झाले आहे. मात्र, आम्ही सर्व जण केवळ निमित्तमात्र आहोत. जे कार्य करायचे असते ते महादेवच करवून घेतात. त्यामुळे या यश प्राप्तीचे संपूर्ण श्रेय भगवान महादेवालाच जाते. हे पुण्यकर्म करण्याची संधी महादेवाने आम्हास दिली आणि आमच्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून हे कार्य पूर्ण करून घेतले, याबद्दल मी मंत्रिमंडळाच्या वतीने महादेवाचे आभार मानतो. या मंदिराला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला असून, तोच सुवर्ण इतिहास पिंपळेश्वर महादेवाला पुन्हा प्राप्त करून देण्याचे काम शासन या ठिकाणी करणार आहे.कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंढरीनाथ पाटील यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि आमदार रवींद्र चव्हाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि आमदार रवींद्र चव्हाण यांनी मांडलेल्या मंदिर परिसराच्या विकासाच्या सर्व मागण्या प्राधान्याने पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

# एल- नीनो चा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पेरणीच्या पद्धतीत बदल आवश्यक

**दैनिक युवक आधार**
**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : हवामान खात्याच्या अंदाजानुसार किमान 15 जून पर्यंत विदर्भात काही भागात मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे, तथापि हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल अशी परिस्थिती नाही. मान्सून कोकणात दाखल झाला पण सर्व दूर सक्रिय नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

एल निनो चा प्रादुर्भाव कमी करण्याकरता तसेच सरासरी पडणारा पाऊस व पावसातील खंड यामध्ये पिकांचे संरक्षण महत्त्वाचे आहे, अशा परिस्थितीत पेरणी पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे .

मूलस्थानी जलसंधारण यानुसार पेरणीची पद्धत बदलणे आवश्यक आहे. कापूस, सोयाबीन आदी पिकांची पारंपारिक पद्धतीने जमिनीवर पेरणी न करता सरीवरंभा पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. या पद्धतीमुळे जास्त पाऊस झाला तर जमिनीत पावसाच्या पाण्याची साठवण करता येते तसेच पावसामध्ये खंड पडल्यास पिकांचे संरक्षण करणे , सुलभ होणार असल्याचेही कृषी उमेश संचालक घाडगे यांनी यावेळी सांगितले.

एल दिनोचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कापूस पिकांची लागवड सरी वरंभा पद्धतीनेच करावे तसेच सोयाबीन पिकाची लागवड सुद्धा सरीवरंबा अथवा बीबीएफ पद्धतीने करण्याला प्राधान्य देण्यात यावे. पावसातील खंड लक्षात घेता विभागात सरासरी 50 टक्के कापूस व 30 टक्के सोयाबीन हे नवीन पद्धतीने म्हणजेच सरीवरंभा अथवा बीबीएफ चा वापर करूनच पेरणी करावी असे आव्हान कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

**मानसून सर्वदूर सक्रिय नसल्यामुळे पेरणीची घाई करू नये सरीवरंभा पद्धतीनुसारच पेरणीला प्राधान्य द्या**

भात पिकांची लागवड करताना श्री पद्धतीने अथवा बीएसआर नुसार भाताची पेरणी करावी असे आव्हान करताना कृषी सहसंचालक उमेश घाडगे म्हणाले की भाताची लागवड करताना रोहनीची आवश्यकता नाही जर रोवणी करायची असेल तर पंधरा दिवसाच्या आत करावी त्यानंतर उत्पादनात घट होण्याची शक्यता अधिक आहे. विभागात सरासरी 20% भात पिकांची लागवड पेरणी श्री पद्धतीने करण्याला प्राधान्य देण्यात आले असल्याचीही त्यांनी यावेळी सांगितले. लागवडी सोबतच खताची मात्रा सुद्धा दिल्यास पिकांच्या वाडीला उपयुक्त उठणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करता पेरणीसाठी आवश्यक पाऊस पडल्यानंतरच पेरणीला सुरुवात करावी असे आवाहनही कृषी सह संचालक उमेश घाडगे यांनी केले आहे.

# पश्चिम विदर्भ जनजागर अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद; सिंदखेड राजात विदर्भ राज्य निर्माण जनसंकल्प मेळाव्याची तयारी सुरू

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने अध्यक्ष ॲड. वामनराव चटप यांच्या नेतृत्वाखाली ६ व ७ जून २०२६ रोजी पश्चिम विदर्भात व्यापक जनजागर अभियान राबविण्यात आले. या अभियानात युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, कोअर कमिटी सदस्य डॉ. पद्माताई राजपूत तसेच दिवंगत विदर्भ वीरांगना रंजनाताई मामर्डे यांच्या कन्या श्रीवल्ली आणि जावई कार्तिकेय यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**माँ जिजाऊंच्या माहेरी विदर्भ नेत्यांचा सत्कार**

शनिवार, ६ जून रोजी माँ जिजाऊंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक राजवाड्यात विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या शिष्टमंडळाचा विशेष सत्कार करण्यात आला. माँ जिजाऊंच्या माहेरच्या वंशावळीतील राजे शिवाजी दत्तात्रय जाधव यांच्या हस्ते ॲड. वामनराव चटप, श्रीवल्ली आणि कार्तिकेय यांचा माँ जिजाऊंची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष सौरभ तायडे, ॲड. रामेश्वर मेहेत्रे, मुकेश मासुरकर, डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, तेजराव मुंढे, डॉ. पद्माताई राजपूत आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते. समितीच्या वतीने उपस्थितांना डॉ. श्रीनिवास खांदेवाले लिखित 'महाराष्ट्रात राहण्याचा अनुभव व विदर्भ राज्याची अपरिहार्यता' हे पुस्तक तसेच 'हा घ्या महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीत निघाल्याचा पुरावा' या विषयावरील माहितीपत्रक भेट देण्यात आले.

**विदर्भ राज्य निर्माण जनसंकल्प मेळाव्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक**

यानंतर शासकीय विश्रामगृहात विदर्भ राज्य निर्माण जनसंकल्प मेळाव्याच्या आयोजनासंदर्भात जिल्हास्तरीय बैठक पार पडली. बैठकीत २५ जुलै २०२६ रोजी



सिंदखेड राजा येथे होणाऱ्या जनसंकल्प मेळाव्याच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आणि विदर्भ चळवळीतील अग्रणी नेत्या स्वर्गीय रंजनाताई मामर्डे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**रंजनाताई मामर्डे यांच्या कार्याला उजाळा**

यावेळी प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत यांनी रंजनाताईंच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांच्या निधनाने विदर्भ राज्य चळवळीने एक झुंझार, कणखर आणि समर्पित नेतृत्व गमावले आहे. विदर्भाच्या इतिहासाचा त्यांनी केलेला अभ्यास, चळवळीच्या नोंदींचे दस्तऐवजीकरण आणि स्वतंत्र विदर्भासाठीची त्यांची अखंड धडपड पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

श्रीवल्ली कार्तिकेय यांनीही आपल्या मातोश्रींच्या सामाजिक, सांस्कृतिक व चळवळीतील कार्याचा आढावा घेत समितीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**"विदर्भ मिशन २०२७" साठी एकजूट होण्याचे आवाहन**

अध्यक्षीय भाषणात ॲड. वामनराव चटप यांनी विदर्भाच्या विकासातील असमतोल, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, कुपोषण, गर्भवती मातांचे मृत्यू, नक्षलवाद, नैसर्गिक संपत्तीची लूट आणि पर्यावरणीय समस्यांचा उल्लेख करत स्वतंत्र विदर्भ राज्याची आवश्यकता अधोरेखित केली.

"स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती हीच रंजनाताई मामर्डे यांना खरी श्रद्धांजली ठरेल. विदर्भ मिशन २०२७ यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विदर्भवादी कार्यकर्त्याने तन, मन आणि धनाने योगदान द्यावे," असे आवाहन त्यांनी केले.

**आयोजन समितीची घोषणा**

बैठकीत २५ जुलै रोजी होणाऱ्या जनसंकल्प मेळाव्यासाठी आयोजन समितीची घोषणा करण्यात आली.

स्वागताध्यक्ष : राजे शिवाजी दत्तात्रय जाधव सदस्य : वामनराव जाधव, प्रा. दिलीप नाईकवाड, बद्रीभाऊ बुधवत, बालाजी सोसे, प्रवीण गीते, ॲड. रामेश्वर मेहेत्रे, शिवप्रसाद सारडा, ॲड. आर. के. वायाळ, शिवाजीराव खरात, ॲड. अतुल हाडे, प्रा. रामदास शिंगणे आणि ॲड. लुकमान शेख. आवश्यकतेनुसार समितीत नवीन सदस्यांचा समावेश करण्याचे अधिकार स्वागताध्यक्ष राजे शिवाजी दत्तात्रय जाधव यांना देण्यात आले.

**पत्रकार परिषदेत विदर्भ प्रश्नांवर भाष्य**

सायंकाळी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ॲड. वामनराव चटप यांनी विदर्भ राज्य निर्मितीची भूमिका, विदर्भातील विकास प्रश्न आणि आगामी जनसंकल्प मेळाव्याची माहिती प्रसारमाध्यमांसमोर मांडली.

**लोणार सरोवर परिसराची पाहणी**

रविवार, ७ जून रोजी समितीच्या शिष्टमंडळाने जागतिक ख्यातीच्या लोणार सरोवराला भेट देऊन पर्यटन, संशोधन आणि अभ्यास सुविधांचा आढावा घेतला. गोमुख, सीता माता न्हाणीघर, प्राचीन शिवलिंग, हेमाडपंथी मंदिरे तसेच खाऱ्या व गोड्या पाण्याच्या अद्वितीय परिसंस्थेचे निरीक्षण करण्यात आले.या परिसरात पर्यटन आणि संशोधनाला चालना देण्यासाठी अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

**विविध नेत्यांशी विदर्भ प्रश्नांवर संवाद**

जनजागर अभियानादरम्यान शेतकरी नेते शिवप्रसाद मदनलाल सारडा, माजी आमदार संजय रायमुलकर आणि आमदार सिद्धार्थ खरात यांच्याशीही विदर्भ राज्य निर्मिती, प्रादेशिक विकास आणि जनजागृती अभियानासंदर्भात चर्चा करण्यात आली.पश्चिम विदर्भात राबविण्यात आलेल्या या दोन दिवसीय जनजागर अभियानामुळे स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला नव्याने बळ मिळाले असून आगामी जनसंकल्प मेळाव्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईने रायगडातील गावठी दारू माफियांचे धाबे दणाणले?

### रेवदंडा-चौल परिसरात २५ वर्षांपासून अवैध धंदे सुरू असल्याची जनतेत चर्चा; प्रशासन झोपेत का?



**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे | रेवदंडा :** अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोर, नियमभंग करणारे व्यापारी आणि अवैध अन्नपदार्थ विक्रेत्यांविरोधात उघडलेली मोहीम आता अधिक तीव्र होताना दिसत आहे. भेसळयुक्त गूळ, त्याचा अवैध दारू निर्मितीसाठी होणारा वापर आणि त्यातून नागरिकांच्या आरोग्यावर निर्माण होणारा गंभीर धोका या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील काही भागांकडे नागरिकांचे लक्ष वेधले जात आहे.

रेवदंडा, चौल, आग्राव, वावे, रामराज आणि सुडकोली परिसरात अनेक वर्षांपासून गावठी दारूचे अड्डे सुरू असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये वारंवार ऐकायला मिळते. विशेष म्हणजे हे धंदे तब्बल २५ वर्षांहून अधिक काळ सुरू असल्याचे बोलले जात असताना, त्यांच्यावर प्रभावी कारवाई का झाली नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

दारू निर्मितीसाठी वापरला जाणारा गूळ जर भेसळयुक्त असेल, तर त्यापासून तयार होणारी दारू अधिक घातक ठरू शकते. रासायनिक पदार्थांचा वापर करून तयार केलेला किंवा निकृष्ट दर्जाचा गूळ मानवी आरोग्यासाठी धोकादायक असून त्याचा परिणाम यकृत, मूत्रपिंड तसेच इतर अवयवांवर होऊ शकतो. यापूर्वी राज्यातील विविध भागांत विषारी दारूमुळे मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली FDA ने राज्यभर सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळेच अवैध धंदे करणाऱ्यांच्या गुप्त बैठका, हालचाली आणि बचावाचे प्रयत्न वाढल्याची चर्चा सुरू आहे. प्रशासनाच्या या मोहिमेचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील अवैध गावठी दारू व्यवसायावरही पडत असल्याचे चित्र आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अवैध गावठी दारू निर्मिती आणि विक्रीच्या साखळीला काही प्रभावशाली घटकांचे संरक्षण मिळत असल्याच्या चर्चा वेळोवेळी समोर येतात.

मात्र या चर्चांची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. जर कुठल्याही स्तरावर दुर्लक्ष, संगनमत किंवा संरक्षण दिले जात असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

प्रश्न असा आहे की, गावोगावी खुलेआम सुरू असलेल्या या अवैध धंद्यांची माहिती प्रशासनाला नाही का? आणि माहिती असेल तर कारवाई का होत नाही? गावठी दारूमुळे उद्‌ध्वस्त झालेली कुटुंबे, व्यसनाधीन तरुणाई आणि आरोग्याला निर्माण होणारे गंभीर धोके पाहता हा विषय केवळ महसूल किंवा कायद्याचा नसून जनजीवनाशी संबंधित आहे.

तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईमुळे राज्यातील भेसळखोरांचे धाबे दणाणले असताना रायगडातील अवैध गावठी दारू व्यवसायाविरोधातही अशीच व्यापक मोहीम राबविण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

FDA, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन यांनी संयुक्त कारवाई करून अवैध दारू निर्मितीची संपूर्ण साखळी उध्वस्त करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

आता प्रश्न एकच — जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या अवैध धंद्यांवर शासनाचा हातोडा कधी पडणार?

---

## दर्यापूर शासकीय धोरणामुळे युरियाचा बफर साठा गोदामात, शेतकरी मात्र खतावाचून हवालदिल

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : पहिल्या पावसाने खरीप हंगामाला वेग आला असताना, दऱ्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर मात्र युरिया खताची भीषण टंचाई उभी ठाकली आहे. एकीकडे पेरणीपूर्व मशागतीची लगबग सुरू आहे, तर दुसरीकडे आवश्यक खत मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. शासकीय धोरण आणि लालफितीच्या कारभारामुळे तालुका खरेदी-विक्री संघाच्या गोदामात पडून असलेला हजार बॅगचा बफर साठा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकत नाहीये.

तालुका खरेदी-विक्री संघाच्या गोदामात सध्या युरियाचा मोठा साठा उपलब्ध आहे. अधिकृत माहितीनुसार तेथे सुमारे 10 हजार बॅग युरिया बफर स्टॉक म्हणून साठवून ठेवण्यात आला आहे. मात्र जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या लेखी परवानगीशिवाय हा साठा विक्रीसाठी खुला करता येत नाही. त्यामुळे "धरण उशाला आणि कोरड घशाला" अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.

कृषी केंद्र चालकांच्या म्हणण्यानुसार, जिल्हा प्रशासनाच्या आदेशाची वाट पाहत हा साठा गोदामातच पडून आहे. परवानगीचा फाईल अडकल्याने वेळेवर खत न मिळाल्यास खरीप हंगाम धोक्यात




येण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

युरिया मिळत नसल्याने शेतकऱ्यांना तालुक्याबाहेर 50 ते 60 किलोमीटरपर्यंत भटकंती करावी लागत आहे. जवळच्या कृषी केंद्रांवर दिवसभर रांगा लावूनही खत न मिळाल्याने अनेक ठिकाणी संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही शेतकऱ्यांनी कृषी केंद्र चालकांवर साठेबाजीचा आरोपही केला आहे.

"पेरणीची वेळ चालली आहे. बियाणे टाकले, पण युरिया मिळत नाही. रोज कृषी केंद्राचे उंबरठे झिजवतोय. 60 किमी जाऊन आलो, तरी एकही बॅग मिळाली नाही," अशी खंत एका शेतकऱ्याने व्यक्त केली.

कृषी केंद्र चालकांचे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे मागणी असूनही पुरवठा होत नाही. "शेतकऱ्यांचा रोष आमच्यावर निघतो, पण वस्तुस्थिती अशी आहे की गोदामात खत पडून आहे. जिल्हा प्रशासनाने बफर स्टॉक तातडीने रिलीज केला तर आम्हालाही दिलासा मिळेल आणि शेतकऱ्यांनाही खत मिळेल," असे एका कृषी केंद्र चालकाने सांगितले.

खरीप हंगामाच्या तोंडावर निर्माण झालेल्या या संकटाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी शेतकरी, कृषी केंद्र चालक आणि नागरिकांकडून होत आहे.

तालुका खरेदी-विक्री संघातील बफर साठा त्वरित खुला करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

जर वेळेत युरिया उपलब्ध झाला नाही, तर पेरणी लांबणीवर पडून उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांचे नुकसान टाळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---


# जन्म नशिबावर तर भविष्य कर्मावर ठरतं!

## जन्म आपल्या हातात नसतो, पण भविष्य घडवणे नक्कीच आपल्या हातात असतं!

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : माणूस कोणत्या घरात जन्माला येईल, त्याचं बालपण कसं असेल किंवा घरची परिस्थिती कशी असेल, हे त्याच्या हातात नसतं. कोणीही ठरवून जन्म घेत नसतो. काही लोक जन्मत:च सोन्याचा चमचा तोंडात घेवून जन्मतात, सुखात वाढतात, तर काही लोक अभावाच्या सावलीत वाढतात. पण एक गोष्ट मात्र निश्चित जन्म नशिबावर अवलंबून असतो, पण भविष्य मात्र कर्मावर उभं राहतं!

आज अनेकदा आपण ऐकतो, 'माझी परिस्थिती गरिबीची आहे', 'माझ्याकडे पैसे नाहीत', 'माझ्यासाठी संधी नाहीत'. पण खरंच, परिस्थितीच सर्वकाही ठरवते का? जर असं असतं, तर इतिहासातील अनेक थोर व्यक्ती कधीच पुढे आल्या नसत्या. माझ्या आयुष्याचं उदाहरण द्यायचं झालं तर, आमच्या कुटुंबाकडे एकेकाळी 35एकर जमीन होती. आज त्या जमिनीतला एक गुंठाही आमच्या नावावर नाही. पण याचा अर्थ असा होतो का की, मी परिस्थितीला दोष देत बसावं? गेलेले दिवस परत येणार नाहीत, पण येणारे दिवस कसे असतील, हे ठरवण्याची ताकद आजही माझ्यात आहे. परिस्थिती बदलत असते. काळ बदलतो. संपत्ती येते आणि जाते. पण माणसाची जिद्द, मेहनत आणि स्वत:वरचा विश्वास कायम असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीतून पुन्हा उभा राहू शकतो. आजच्या तरुणांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, गरिबी ही कायमस्वरूपी ओळख नसते. ती एक अवस्था आहे आणि अवस्था बदलण्यासाठी प्रयत्नांची गरज असते. 'नशीब दार ठोठावतं की नाही माहीत नाही, पण मेहनत मात्र दररोज नवी संधी निर्माण करते.' आज अनेक युवक मोबाईलवर इतरांचं यश



पाहतात. कोणाची गाडी, कोणाचं घर, कोणाची नोकरी... पण दुस?यांच्या यशाकडे पाहून स्वत:च्या अपयशाची कारणं शोधण्यात आयुष्य वाया घालवू नका. कारण प्रत्येकाची शर्यत वेगळी असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभं करताना संकटांचा डोंगर पेलला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतलं आणि देशाला नवी दिशा दिली. महात्मा फुलेंनी समाजातील अंधार दूर करण्यासाठी आयुष्य खर्च केलं. त्यांनी परिस्थितीला दोष दिला नाही, तर परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला. 'परिस्थिती माणसाची परीक्षा घेते, पण जिद्द माणसाची ओळख बनवते.' आज अनेक विद्यार्थी एका अपयशानंतर खचून जातात. एक परीक्षा चुकली, एक संधी हुकली की सर्व संपल्यासारखं वाटतं. पण सत्य हे आहे की, आयुष्य कोणत्याही एका निकालावर थांबत नाही. 'सूर्य रोज मावळतो, पण दुसऱ्या दिवशी पुन्हा उगवतो; म्हणूनच अपयशानंतर पुन्हा उभं राहणं हेच खऱ्या यशाचं लक्षण आहे.' माझा ठाम विश्वास आहे की, माणूस किती श्रीमंत किंवा गरीब घरात जन्माला आला, यापेक्षा त्याने आयुष्यात काय निर्माण केलं हे अधिक महत्त्वाचं आहे. आज परिस्थिती कठीण असू शकते, पण उद्याचं भविष्य उज्वल असू शकतं.

मी स्वत:ही आज मोठी स्वप्नं पाहतो. कारण माझा विश्वास आहेकी, एक दिवस माझ्या कामामुळे माझी ओळख निर्माण होईल आणि ते नाव पैशांमुळेनाही, तर समाजासाठी केलेल्या कामामुळे होईल. 'ज्यांच्या डोळ्यांत स्वप्नं असतात, त्यांच्याच पायांत संघर्षाची ताकद असते.' म्हणूनच तरुणांना इतकंच सांगावंसं वाटतं की, परिस्थितीला दोष देऊ नका. अभावांना कारण बनवू नका. कारण इतिहास नेहमी त्यांचाच लिहिला जातो, ज्यांनी परिस्थिती बदलण्याचं धाडस केलं.

शेवटी 'जन्म आपल्या होतात नसतो, पण भविष्य घडवणे आपल्या हातात असतं. आणि जे स्वत:चं भविष्य घडवतात, तेच एक दिवस इतरांच्या आयुष्याला दिशा देतात!'

**पंकज गारशेटवाड**
**युवा लेखक व संस्थापक,**
**एजुफेलो हब**
**उमरखेड, जिल्हा यवतमाळ**
**मो. 8263955620**

---

## खत बुकिंग ॲपचा तांत्रिक घोळ; शेतकऱ्यांचे हाल!

### ऑफलाईन वितरणाची परवानगी द्या; विजय म्हस्के-पाटील यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने खत बुकिंगसाठी सुरू केलेल्या नवीन मोबाईल ॲपमधील तांत्रिक त्रुटी व सर्व्हर डाऊन समस्येमुळे शेतकरी आणि कृषी सेवा केंद्र चालक यांच्यात वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. सध्या खरीप हंगाम अगदी तोंडावर आला असून, पेरणीचा हा काळ शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा व धावपळीचा आहे. या काळात शेतकऱ्यांना वेळेवर खते मिळणे गरजेचे असताना, कृषी विभागाने खत बुकिंगसाठी सुरू केलेल्या नवीन मोबाईल ॲपमुळे शेतकरी व कृषी सेवा केंद्र चालक दोघांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत, तर सर्व्हर सुरळीत चालत नसल्याने खत वितरणाच्या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना शेतीकामे सोडून तासनतास कृषी केंद्रावर बसावे लागत आहे. यामुळे शेतकरी व कृषी सेवा केंद्र दुकानदारांमध्ये वाद होत आहेत.या समस्येवर तातडीने वरिष्ठ पातळीवर तोडगा काढावा, तसेच जोपर्यंत हे ॲप पूर्णपणे सुरळीत चालत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ऑफलाईन किंवा जुन्या पद्धतीने खत वितरण करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के-पाटील यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांनाही देण्यात आली असून, प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा विजय म्हस्के-पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# गोंदिया पोलिसांचा स्तुत्य उपक्रम: 'संडे ऑन सायकल' रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि पोलीस-जनता ऐक्याचा दिला संदेश; २५० हून अधिक सायकलस्वार सहभागी"

**दैनिक युवक आधार**
**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : “सुदृढ शरीर, सशक्त मन आणि सुरक्षित समाज” या प्रेरणादायी संकल्पनेला मूर्त रूप देत गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जागतिक सायकल दिन आणि 'फिट इंडिया अभियाना' निमित्त दिनांक ०६ जून २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, कारंजा येथे *“संडे ऑन सायकल”* या विशेष उपक्रमाचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

मा. पंतप्रधानांनी सुरू केलेल्या 'फिट इंडिया' अभियानाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि पोलीस-जनता संबंध अधिक दृढ करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

पहाटेच्या प्रसन्न वातावरणात पोलीस अधिकारी, अंमलदार, त्यांचे कुटुंबीय, पोलीस मित्र, विद्यार्थी, युवक-युवती आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध क्षेत्रांतील सुमारे २५० हून अधिक सायकलप्रेमींनी पोलीस मुख्यालय, कारंजा येथे हजेरी लावली.

प्रभारी पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली या ५ किलोमीटर अंतराच्या सायकल रॅलीला सुरुवात



झाली. श्रीमती रोहिणी बानकर उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया यांनी हिरवी झेंडी दाखवत सायकल रॅली ची औपचारिक सुरुवात केली. ही रॅली फुलचूर मार्गे मार्गक्रमण करत कमालीच्या शिस्तीत आणि उत्साहात पुन्हा पोलीस मुख्यालय येथे विसावली.

सायकलिंग ही केवळ शारीरिक तंदुरुस्तीची साधना नसून स्वच्छ पर्यावरण, मानसिक स्वास्थ्य आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा मार्ग आहे, हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. रॅली दरम्यान संपूर्ण परिसरात सामाजिक एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे खाकी वर्दीतील कर्तव्यकठोरता बाजूला ठेवून पोलीस अधिकारी आणि सामान्य नागरिक एकाच रंगात रंगून आरोग्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा नवा संकल्प करत होते. कार्यक्रमात सहभागींनी नियमित व्यायाम, योग, सायकलिंग आणि आरोग्यदायी सवयी आत्मसात करण्याचे आवाहन स्वीकारले.सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभारी पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती रोहिणी बानकर, श्री. रामदास शेवते (प्रभारी पोलीस उपाधीक्षक, गृह), श्री नागेश भास्कर (पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा गोंदिया), श्री. राजेश सरोदे (राखीव पोलीस निरीक्षक), श्री. दीपक शेंडे, (राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय गोंदिया), श्री. श्रीकांत हत्तीमारे (पोलीस उपनिरीक्षक, नक्षल सेल गोंदिया), तसेच पोलीस मुख्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयातील अंमलदार यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. तसेच जिल्ह्यातील उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार, शाखा प्रमुख, तसेच अधिनस्त पोलिस अधिकारी आणि अंमलदार हे आवर्जून उपस्थित होते. या रॅलीत 'संडे सायकल ग्रुप, गोंदिया' चे सदस्य, तसेच आंतरराष्ट्रीय वयोवृद्ध धावपटू श्री. मुन्ना यादव यांनी देखील आपली विशेष उपस्थिती नोंदवून उपक्रमाची शोभा वाढवली.“आरोग्यदायी नागरिक हेच राष्ट्राची खरी ताकद आहेत” हा संदेश देणारा गोंदिया पोलिसांचा “संडे ऑन सायकल” उपक्रम केवळ एक उपक्रम न राहता आरोग्य,

पर्यावरण संवर्धन आणि पोलीस–जनता सहभाग यांचा एक प्रेरणादायी उत्सव ठरला. या उपक्रमाने प्रत्येक सहभागीच्या मनात तंदुरुस्त जीवनशैलीचा नवा संकल्प रुजविला.

---

# जयताळा लास्ट बस स्टॉप ते पायोनियर डॅफोडिल मार्गावरील वाहतूक कोंडी दूर होणार ; रस्ता रुंदीकरणाला गती

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** जयताळा लास्ट बस स्टॉप ते पायोनियर डॅफोडिल या महत्त्वाच्या मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठोस पाऊल उचलले आहे. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपीन इटनकर यांनी आज प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून रस्ता रुंदीकरणाचे काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या मार्गावर गेल्या काही वर्षांपासून वाढत्या वाहतुकीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत होता. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक कोंडीची समस्या गंभीर स्वरूप धारण करत होती. नागरिकांकडून सातत्याने होत असलेल्या मागणीची दखल घेत महानगरपालिकेने या मार्गाच्या रुंदीकरणाचा निर्णय घेतला आहे.

स्थळ पाहणीदरम्यान आयुक्तांनी रस्त्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेत




कामाच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश देताना, या कामामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना शासनाच्या नियमांनुसार योग्य मोबदला (मुआवजा) देण्यात यावा, असेही स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

या पाहणीवेळी ADP विभागाचे अधिकारी ऋतुराज जाधव, भाजयुमोचे पारेंद्रजी पटले, भाजप नेते आनंदजी नितनवरे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत वाहतूक समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे या परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असून, प्रवासाचा वेळ कमी होईल. तसेच परिसरातील निवासी व व्यावसायिक विकासालाही चालना मिळणार आहे. जयताळा परिसराच्या वाढत्या लोकसंख्येचा आणि वाहतुकीचा विचार करता हे विकासकाम अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी आणि शहरातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत असलेले हे पाऊल भविष्यातील नागपूरच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विकासाच्या वाटचालीत जनहिताला प्राधान्य देत जयताळा परिसराच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

---

# मुंबई मराठी पत्रकार संघाचे पत्रकारितेतील प्रतिष्ठेचे विविध पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कारांचे मानकरी जाहीर करण्यात आले आहेत. ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक व यूएनआय वृत्तसंस्थेचे महाराष्ट्रातील माजी ब्युरो चीफ जयंत माईणकर, एबीपी माझाच्या वृत्तनिवेदिका ज्ञानदा कदम, महाराष्ट्र टाइम्सचे माजी मुद्रितशोधक दिगंबर सावंत, दै. सामनाचे वृत्तछायाचित्रकार संदीप पागडे, दै. नवराष्ट्रचे रामकृष्ण खांदारे आणि पत्रकार राजेंद्र साळसकर यांना यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारांचे यंदाचे ३६ वे वर्ष आहे.

रोख रुपये दहा हजार, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल, अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता होणाऱ्या पत्रकार संघाच्या ८४ व्या वर्धापन दिन सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या समारंभास द प्रिंटचे संपादक ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता हे महनीय प्रवक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा समारंभ पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१ येथे संपन्न होईल.

यंदापासून पत्रकार संघाने बहुभाषिक ज्येष्ठ पत्रकार — साहित्यिक स्व. शरद वैद्य यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सर्वोत्कृष्ट निवेदक - सूत्रसंचालकासाठी (अँकर) पुरस्कार सुरू केला आहे. या पहिल्या पुरस्कारासाठी एबीपी माझाच्या वृत्त निवेदिका ज्ञानदा कदम यांची निवड करण्यात आली आहे. या समारंभात वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केलेले पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य यांनाही पत्रकार संघाचे सन्माननीय सदस्यत्व आणि सन्माननीय सहसदस्यत्व दिले जाणार आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कार आज संघाचे अध्यक्ष श्री. संदीप चव्हाण यांनी जाहीर केले. पुरस्काराचे यंदाचे मानकरी पुढीलप्रमाणे आहेत.

**जयंत माईणकर, ज्ञानदा कदम, दिगंबर सावंत, संदीप पागडे, रामकृष्ण खांदारे, राजेंद्र साळसकर पुरस्काराचे मानकरी**

शोधपत्रकारितेसाठी दिला जाणारा ‘पद्मश्री यमुनाताई खाडिलकर स्मृती पुरस्कार’ : रामकृष्ण खांदारे (दै. नवराष्ट्र) वृत्तपत्रात काम केलेल्या ज्येष्ठ मुद्रितशोधकास दिला जाणारा ‘कविवर्य प्रा. भालचंद्र खांडेकर’ पुरस्कार : श्री. दिगंबर सावंत (महाराष्ट्र टाइम्समधून निवृत्त).सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केल्याबद्दल दिला जाणारा ‘समतानंद अनंत हरि गद्रे’ पुरस्कार : श्री. राजेंद्र साळसकरवृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून प्रदीर्घ कामगिरीबद्दल दिला जाणारा ‘अॅड. अधिक शिरोडकर पुरस्कृत तोलाराम कुकरेजा वृत्तछायाचित्रकार’ पुरस्कार : श्री. संदीप पागडे (दै. सामना)ज्येष्ठ पत्रकार/ संपादकास दिला जाणारा ‘युगारंभकार, सर्वोदयी कार्यकर्ते मधुसूदन सीताराम रावकर स्मृती पुरस्कार’ : श्री. जयंत माईणकर (राजकीय विश्लेषक आणि यूएनआय वृत्तसंस्था महाराष्ट्रचे माजी ब्युरो चीफ)

---

# विकसित भारत-2047 चे स्वप्न साकार करण्यासाठी जागरूक समाज आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वपूर्ण – सभापती प्रा. राम शिंदे

## सीपीए भारत विभाग झोन-2 परिषदेत विकसित भारत राष्ट्रीय संकल्पासंदर्भात विचारमंथन

**दैनिक युवक आधार**
**चंदीगड (प्रतिनिधी ) :** विकसित भारत-2047 हे केवळ शासनाचे ध्येय नसून संपूर्ण राष्ट्राचा सामूहिक संकल्प आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जागरूक समाज, सक्षम लोकशाही संस्था आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधी यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

सीपीए भारत विभाग झोन-2 परिषदेत "विकसित भारत-2047 चे उद्दिष्ट साकारण्यात जागरूक समाज आणि लोकप्रतिनिधींची भूमिका आणि भविष्यातील आव्हाने" या विषयावर ते बोलत होते. हरियाणा विधानसभा यांच्या वतीने चंदीगड येथे दिनांक 7 ते 10 जून 2026 या कालावधीत आयोजित या परिषदेस लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती श्री. हरिवंश, हरियाणा विधानसभा अध्यक्ष श्री. हरविंदर कल्याण, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीर येथील पीठासीन अधिकारी तसेच विविध राज्य विधानमंडळांचे पीठासीन अधिकारी, सदस्य उपस्थित आहेत.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकशाहीची खरी ताकद केवळ मतदान प्रक्रियेत नसून संवाद, चर्चा आणि विधायक विचारमंथनात आहे. संसद आणि विधानमंडळांमधील सशक्त चर्चा, विधायक वादविवाद आणि लोकहिताच्या दृष्टीने घेतले जाणारे निर्णय हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे. संवाद जीवंत राहिला तर लोकशाही सशक्त राहते आणि विचारमंथन समृद्ध झाले तर राष्ट्र अधिक सक्षम बनते.

लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या झोन (विभाग) स्तरिय परिषदांची संकल्पना ही दूरदृष्टीपूर्ण आणि लोकशाहीला नवी ऊर्जा देणारी असल्याचे सांगत त्यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. विविध राज्यांच्या विधानमंडळांतील सर्वोत्तम संसदीय परंपरा, अनुभव आणि नवकल्पनांच्या आदान-प्रदानातून भारतीय संसदीय लोकशाही अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील "विकसित भारत-2047" या राष्ट्रीय उद्दीष्ट्याचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, सन 2047 हे वर्ष स्वातंत्र्याच्या शताब्दीचे प्रतीक आहेच आणि त्याबरोबर भारताच्या भावी वाटचालीचे दिशा-निर्देशक वर्ष देखील आहे.

गरिबीमुक्त, ज्ञानाधिष्ठित, तंत्रज्ञानसंपन्न, सांस्कृतिकदृष्ट्या आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक नेतृत्व करणारा भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे.

यावेळी त्यांनी लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीवर विशेष भर देत सांगितले की, जनप्रतिनिधी हे केवळ कायदे करणारे नसून समाजाच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे घटक आहेत. जनतेचा विश्वास संपादन करत विकासाभिमुख निर्णय प्रक्रिया प्रभावीपणे राबविणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे विकसित भारताच्या प्रवासात विधानमंडळांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहणार आहे.

हरियाणाच्या पवित्र भूमीचा उल्लेख करताना त्यांनी कुरुक्षेत्र आणि श्रीमद्भगवद्गीतेच्या संदेशाची आठवण करून दिली. कर्तव्य, नेतृत्व, लोककल्याण आणि राष्ट्रहित यांचा संदेश देणारी गीता आजही विकसित भारताच्या संकल्पासाठी मार्गदर्शक आहे, असे त्यांनी सांगितले.

समाज आपल्या कर्तव्यांप्रति जागरूक राहिला आणि लोकप्रतिनिधी संविधानिक जबाबदाऱ्यांप्रति कटिबद्ध राहिले तर विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारत आज जगातील सर्वात मोठी लोकशाही, सर्वाधिक युवा शक्ती असलेला देश आणि वेगाने प्रगती करणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असल्याचे नमूद करत त्यांनी लोकशाही संस्कृती अधिक सुदृढ करण्याचे आवाहन केले. मतभेद असावेत, मात्र मनभेद नसावेत; स्पर्धा असावी, पण कटुता नसावी; विरोध असावा, परंतु वैमनस्य नसावे आणि राजकारणापेक्षा राष्ट्रनीती सर्वोच्च असावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी लोकप्रतिनिधींनी सभागृहाच्या कामकाजात विधायक भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी "फोर-डी" (Four-D) संकल्पना मांडली. Debate, Discussion, Decide आणि Do Not Disturb ही लोकशाही बळकट करणारी चार महत्त्वाची तत्त्वे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सभागृहाची प्रतिष्ठा, दर्जेदार चर्चा, विधायक सूचना आणि जनहिताचे निर्णय हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

ही परिषद केवळ चर्चेपुरती मर्यादित न राहता विकसित भारत-2047 च्या राष्ट्रीय संकल्पाला नवी दिशा आणि नवी ऊर्जा देईल,

असा विश्वास व्यक्त करत सर्वांनी लोकशाही मूल्ये, संसदीय परंपरा आणि जनविश्वास अधिक बळकट करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आपल्या भाषणात सभापती प्रा. राम शिंदे यांनी शेवटी केले.

---

# सीताबर्डी व महाल परिसरात मनपाची अतिक्रमणविरोधी धडक कारवाई

## १४ अवैध शेड व ७ ओटे हटविले

**दैनिक युवक आधार**
**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर महानगरपालिकेच्या प्रवर्तन विभागामार्फत शहरातील सीताबर्डी व महाल परिसरात सोमवारी व्यापक अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान अनेक अवैध ठेले, दुकाने, शेड आणि ओटे हटविण्यात आले असून मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले.

सीताबर्डी परिसरात अंतर्गत पथक क्रमांक ०१ व ०३ यांनी संयुक्तपणे कारवाई केली. सीताबर्डी मेन रोड, व्हेरायटी चौक आणि परिसरातील मुख्य मार्गांवर रस्ते व पदपथांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम दिवसभर सुरू होती. या कारवाईत रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेले अवैध ठेले व दुकाने हटविण्यात आली.

तर महाल परिसरात अंतर्गत पथक क्रमांक ०२, ०४ व ०५ यांनी संयुक्तरित्या अतिक्रमणविरोधी मोहीम राबविली. महाल चौक, बडकस चौक, शिवाजी पुतळा परिसर, केडीबाग रोड, गडकरी वाडा तसेच कल्याणेश्वर मंदिर परिसरात अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान १४ दुकानांवरील अवैध शेडचे बांधकाम पाडण्यात आले, तर दुकानांसमोरील ७ अनधिकृत ओटे तोडण्यात आले. याशिवाय पदपथ व रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून अंदाजे चार



ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. कारवाई सायंकाळपर्यंत सुरू होती.

ही मोहीम प्रवर्तन विभागाचे उपायुक्त श्री. मंगेश खवले आणि सहायक आयुक्त श्री. संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकांनी यशस्वीपणे पार पाडली. नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत ठेवणे, पदपथ मोकळे करणे आणि नागरिकांना सुरक्षित व सुलभ मार्ग उपलब्ध करून देणे हा या कारवाईचा मुख्य उद्देश असल्याचे प्रवर्तन विभागाने स्पष्ट केले.

# बिरसा मुंडा : 126 व्या मृत्यू दिन 9 जून (1900)निमित्त अभिवादन




**दैनिक युवक आधार**

**दक्षिण नागपूर डॉ सुनिल भगत प्रतिनिधी** : बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातू या गावी १५ नोव्हेंबर, १८७५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण जर्मन मिशननरी स्कूल मध्ये झाले. सगळ्यांमध्ये मिळून मिसळून राहण्याचा बिरसाचा स्वभाव होता. त्यामुळे तरुण वयात त्यांनी समवयस्क आणि समविचारी सहकार्यांचे संघटन केले.

बिरसांना आपल्या वडिलांचे सुगन मुंडांचे जबरदस्तीने धर्मांतर केल्याबद्दल ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व इंग्रजांचा मनस्वी राग येत असे. त्यातच अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांकडून होणारा अत्याचार पाहून इंग्रज अधिकाऱ्यांना धडा शिकवण्याचा विचार त्यांनी केला. बिरसा मुंडांनी गोडगेडा गावातील स्वामी आनंद पांडे यांना गुरुस्थानी मानले होते. त्यांच्या आशीर्वादाने आणि त्यांच्या सहकार्या ने इंग्रज सरकारच्या अन्यायाविरोधात बिरसा मुंडाने छोटा नागपूर क्षेत्रात इ.स १८९५ साली लढा उभारला.

इंग्रजांनी त्याला अटक केली व तुरुंगात अतोनात छळ केला. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांचा वयाच्या २५ व्या वर्षी रांचीच्या जुन्या मध्यवर्ती कारागृहात मृत्यू झाला. अधिकृत ब्रिटिश वसाहतकालीन नोंदींनुसार त्यांचा मृत्यू कैदेत असताना कॉलरामुळे झाला असला तरी, इतिहासकार आणि आदिवासी समाजात असा व्यापक संशय आहे की, त्यांच्या क्रांतिकारक कार्यांमुळे त्यांना विषबाधा झाली असावी किंवा त्यांचा छळ करण्यात आला असावा.

**बिरसा मुंडा यांना लोकांनी जननायक हा किताब बहाल केला.**

बिरसाचे सन १८८६ ते १८९० या काळात चैबासा येथे वास्तव्य होते. हा कालावधी जर्मन आणि रोमन कॅथोलिक ख्रिश्चन आंदोलनासाठी ओळखला जातो. त्यामुळे सुगन मुंडा यांनी शाळेतून आपला मुलाचे-बिरसाचे नाव काढून घेतले होते. चैबासा हे तत्कालीन सरदारांच्या राज्याच्या राजधान्यांपासून फार दूर नव्हते. सरदारांच्या आंदोलनांत इंग्रज शिपायांनी बिरसाला अशा प्रकारे पकडले की त्याच्यावर धर्मविरोधी आणि सरकारविरोधी शिक्का मारला गेला. १८९० मध्ये चैबासा सोडून दिल्यानंतर बिरसा आणि त्याचे कुटुंबाने जर्मन मिशनचे सदस्यत्व सोडून दिलेली. सरदारांच्या विरोधात आदिवासी ख्रिश्चन होऊ लागले आणि त्यामुळे भारत छोडो आंदोलनाबरोबरच बिसा मुंडा त्याच्या मूळ पारंपरिक आदिवासी धार्मिक व्यवस्थेकडे वळला.

वाढत्या सरदार आंदोलनामुळे त्यांनी कोर्बेरा सोडला. पोराहाट परिसरातील पेरींगच्या गिडियूनच्या नेतृत्वाखालील संरक्षित जंगलात मुंडाच्या पारंपारिक अधिकारांवर केलेल्या निर्बंधांवर लोकप्रिय असहिष्णुतेमुळे झालेल्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला. १८९३-९४ च्या दरम्यान गावांमध्ये सर्व कचऱ्याची जमीन, ज्याची मालकी सरकारमध्ये निहित होती, १८८२ च्या भारतीय वन अधिनियम ७ च्या अंतर्गत संरक्षित जंगलात गृहीत धरली गेली. सिंहभाममध्ये पलामू आणि मानभूमप्रमाणे जंगल वस्ती सुरू करण्यात आली आणि उपाय योजण्यात आले. वन-निवासी समुदायांचे हक्क निश्चित करण्यासाठी घेतले. जंगलातल्या गावांना सोयीस्कर आकाराच्या ब्लॉकमध्ये ठळक केले गेले आहे ज्यामध्ये फक्त गावांचीच नव्हे तर खेड्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागवड योग्य आणि कचरा जमीन देखील आहे. १८९४ मध्ये, बिरसा एक शक्तिशाली तरुण, हुशार आणि बुद्धिमान बनले आणि बऱ्याचदा गारबरा येथील डंबरी टँक दुरुस्त करण्याच्या कामाचे कार्य केले.

सिंघममधील शंकरा गावातील शेजारच्या परिसरात त्याला एक उपयुक्त साथीदार सापडला, त्याने तिच्या पालकांना दागदागिने घातली आणि विवाहाच्या कल्पनाबद्दल समजावून सांगितले. नंतर, तुरुंगातून परतल्यावर तिचा दुर्दैवाने मृत्यू झाला. चळकड येथे त्याची सेवा करणाऱ्या आणखी एक महिला माथीस मुंडाची बहीण होती. तुरुंगातून सोडल्यानंतर कोळी मुंडा यांनी ठेवलेल्या कोनेसरच्या मथुरा मुदा यांची मुलगी आणि जिरीच्या जगगाव मुंडे यांच्या पत्नीने बिरसाची पत्नियां बनवण्याचा आग्रह धरला. त्याने त्यांना धमकावले आणि जगगाव मुंडे यांची बायको आपल्या पतीला दिली. बिरसा बरोबर राहिलेली आणखी एक सुप्रसिद्ध स्त्री बरुदीहची साळी होती.

बिरसा यांनी आपल्या जीवनात नंतरच्या एका टप्प्यावर एकाग्रतावर भर दिला. बिरसा शेतकऱ्यांमधील सर्वात कमी दर्जाच्या गुलाबांमधून उगवला, जो त्यांच्या नावे इतरांपेक्षा वेगळा होता, मुंदारी खुंटकट्टी व्यवस्थेमध्ये फारच कमी अधिकारांचा आनंद घेतात; संस्थापक वंशाच्या सदस्यांनी सर्व विशेषाधिकारांचे एकाधिकार केले होते, परंतु शेती-उत्पादकांपेक्षा ही रित्या चांगली नव्हती. नोकरीच्या शोधात ठिकाणाहून चालत असलेल्या लहान मुलाच्या रूपात बिरसाचा स्वतःचा अनुभव, त्याला शेतीविषयक प्रश्न आणि वनविषयक बाबींमध्ये अंतर्दृष्टी देण्यात आली; तो निष्क्रिय नसलेला प्रेक्षक होता परंतु अतिपरिचित चळवळीत सक्रिय सहभागी होता.

**नवीन धर्म**

देवाच्या संदेशवाहक आणि नवीन धर्माचा संस्थापक होण्यासाठी बिरसाचा दावा मिशनऱ्यांसाठी अयोग्य ठरला. त्याच्या पंथातही ख्रिश्चन धर्म, मुख्यत्वे सरदार होते. त्याच्या कराराची सोपी व्यवस्था कर आकारणी करणाऱ्या चर्चच्या विरोधात होती. एका देवतेच्या संकल्पनेने त्याच्या धर्माला व आर्थिक धर्माचे आरोग्य करणारा, चमत्कार करणारा कार्यकर्ता आणि उपदेशाचा प्रसार करणारा लोक यांच्याकडे अपील केले. मुंडा, ओरेन्स आणि खारीस नवीन संदेष्टा पाहण्यासाठी आणि त्यांच्या आजारांपासून मुक्त होण्यासाठी चाळकडकडे आले. ओराण आणि मुंडा लोकसंख्या पल्मौमध्ये बरवारी आणि चेचरीपर्यंत वाढली. समकालीन आणि नंतरचे लोक गाणे, त्यांच्या लोक, त्यांच्या आनंद आणि अपेक्षा या दिवशी बिरसाचा प्रचंड प्रभाव दर्शवित आहेत. धर्ती आबाचे नाव प्रत्येकाच्या ओठांवर होते. सदाणीतील लोक गीताने दर्शविले की जाति हिंदू आणि मुसलमानांच्या मार्गावर केलेला पहिला प्रभाव देखील नव्या धर्माच्या धर्माकडे आला.

**आदिवासी मूळ पारंपरिक व्यवस्थेचा पाठपुरावा**

बिरसा मुंडा यांनी आदिवासी लोकांना त्यांच्या मूळ पारंपरिक आदिवासी धार्मिक व्यवस्थेचा पाठपुरावा करण्यास सल्ला दिला. त्याच्या शिकवणींनी प्रभावित होऊन आदिवासी लोकांना तो एक संदेष्टा बनला आणि त्यांनी त्यांचे आशीर्वाद मागितले.

**आदिवासी चळवळ**

नारा मोरे, बोकारो स्टील सिटी, झारखंड येथे नबेंदु सेन यांची बिरसा मुंडा बिरसा मुंडाचा नारा ब्रिटिश राज-अबू राज सेटर जन, महाराणी राज तुंडू जन ("राणीचा राज्य संपुष्टात येऊ द्या आणि आमचे राज्य स्थापन होऊ द्या") यांना धमकी देत आहे - आज उडीसा, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशातील प्रदेशांमध्ये याद आहे.

ब्रिटिश औपनिवेशिक व्यवस्थेने आदिवासी कृषी व्यवस्थेस सामंतिक स्थितीत रूपांतरित केले. आदिवासींनी त्यांच्या मूळ तंत्रज्ञानामुळे अधिशेष निर्माण करू शकले नाही, म्हणून छोटानागपुरमधील प्रमुखांनी आदिवासींना शेतकरी स्थापन करण्यास व शेतकरी म्हणून नियुक्त करण्यासाठी आमंत्रित केले. यामुळे आदिवासींनी घेतलेल्या जमिनींचा विपर्यास झाला. थाकादर्सची नवीन वर्ग अधिक दडपशाही प्रकाराची होती आणि त्यांची बहुतेक मालमत्ता बनविण्यास उत्सुक होती.

१८५६ मध्ये जगिर ६०० वाजले आणि ते एका गावातून १५० गावांमध्ये गेले. परंतु १८७४ पर्यंत जुने मुंडा किंवा ओराणचे नेते यांचे अधिकार जवळपास जमीनदारांनी सादर केलेल्या शेतकऱ्यांकडून संपूर्णपणे रद्द करण्यात आले होते. काही गावांमध्ये त्यांनी त्यांचे मालकी हक्क गमावले आणि शेतमजूरांची स्थिती कमी केली.

कृषी विस्कळीत आणि संस्कृतीच्या बदलाच्या दोन आव्हानांना, बिरसा यांनी मुंडेसह त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विद्रोह आणि विद्रोहांच्या मालिकेतून प्रतिसाद दिला. मुंद्यांच्या जमिनीचा खरा मालक म्हणून, आणि मध्यस्थ आणि ब्रिटिशांना निर्वासित करण्याचा हक्क म्हणून आंदोलन करण्याची मागणी केली गेली.

३ फेब्रुवारी १९०० रोजी चक्रधरपूरच्या जामकोपई जंगलात त्याला अटक करण्यात आली. उपायुक्त रांची यांनी दिलेल्या पत्रानुसार, १५ वेगवेगळ्या गुन्हेगारी प्रकरणांमध्ये ४६० आदिवासींना आरोपी बनवण्यात आले होते, त्यापैकी ६३ जणांना शिक्षा झाली होती. एकाला मृत्युदंड, ३९ जणांना जन्मठेपेची आणि २३ जणांना चौदा वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. बिरसा मुंडा यांचा तुरुंगात खटल्यांदरम्यान मृत्यू झाला होता. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांचा तुरुंगात मृत्यू झाला.

२५ वर्षांच्या अल्प कालावधीसाठी तो जगला तरी त्याने आदिवासींच्या मनोदशाला उत्तेजन दिले आणि त्यांना छोटानागपुरच्या एका छोट्याशा शहरात आणले आणि ब्रिटिश शासकांना दहशतवादाचा सामना करावा लागला. त्याच्या मृत्यूनंतर चळवळीचा नाश झाला. तथापि, चळवळ किमान दोन मार्गांनी महत्त्वपूर्ण होती. सर्वप्रथम तो औपनिवेशिक सरकारला कायद्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडत असे जेणेकरून आदिवासींची जमीन दिक्कस (बाहेरील) द्वारे सहजपणे काढून घेतली जाऊ शकत नाही. दुसरे म्हणजे पुन्हा एकदा दाखवून दिले की आदिवासी लोकांना अन्यायविरोधी निषेध आणि औपनिवेशिक नियमांविरुद्धचा राग व्यक्त करण्याची क्षमता आहे. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या पद्धतीने आणि संघर्षांच्या चिन्हे शोधून काढल्या.

**लोकप्रिय संस्कृतीत बिरसा मुंडा**

१९८८ च्या स्टॅम्पवर बिरसा मुंडा १५ नोव्हेंबरला होणाऱ्या त्यांच्या जयंतीचा अद्यापही कर्नाटकातील म्हैसूर आणि कोडागू जिल्हेपर्यंत आदिवासी लोकांचा उत्सव साजरा केला जातो आणि झारखंडच्या कोकर रांची येथे समाधीस्थळ येथे अधिकृत कार्य केले जाते.

आज त्याच्या नावावर अनेक संस्था, संस्था व संरचना आहेत, विशेषतः बिरसा मुंडा विमानतळ रांची, बिरसा इंस्टिट्यूट ऑफ़ टेक्नॉलॉजी सिंधरी, बिरसा मुंडा वानवासी छत्रवस, कानपूर, सिद्धो कान्हो बिर्षा विद्यापीठ, पुरुलिया आणि बिरसा कृषी विद्यापीठ. बिहार रेजिमेंटचे युद्ध रोख म्हणजे बिरसा मुंडा की जय. २००८ मध्ये, बिरसाच्या जीवनावर आधारीत हिंदी चित्रपट, गांधी से पहले गांधी यांना त्याच नावाने त्यांच्या कादंबरीवर आधारित इक्बाल दुर्रान यांनी निर्देशित केले होते. आणखी एक हिंदी चित्रपट, "उलुलन-एक क्रांती (द क्रांती)" २००४ मध्ये अशोक सरन यांनी तयार केली, ज्यामध्ये ५०० बिरसाईट्स किंवा बिरसाच्या अनुयायांनी अभिनय केला.

रामन मॅगसेसे पुरस्कार विजेते, लेखक-कार्यकर्ते महाश्वेता देवी यांचे ऐतिहासिक कथा, अरण्यर अधिकारी (१९७७चा अधिकार) १९७९ मध्ये त्यांनी बंगालीसाठी साहित्य अकादमी पुरस्कार जिंकला असा एक उपन्यास, त्यांच्या आयुष्यावर आणि मुंडा विद्रोहांवर आधारित आहे.

---

## ऐरोलीतील इंद्रावती हॉस्पिटल चा भोंगळ कारभार पैशाच्या मोहापोटी रुग्णांचा बळी

**दैनिक युवक आधार**

**अमोल कांबळे ( ऐरोली प्रतिनिधी ) :**पैसा देऊनही पेशंट वाचत नाही! इंद्रावती हॉस्पिटलच्या निष्काळजीपणामुळे गेल्या वर्षभरात अनेक निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागल्याचा खळबळजनक आरोप होत आहे. लाखो रुपये मोजूनही रुग्णांचे प्राण वाचत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

**राजकीय वरदहस्त आणि मुजोरी:**

हॉस्पिटल मॅनेजमेंटच्या या मनमानी कारभाराला काही राजकीय लोकांचा पाठींबा असल्याचा आरोप होत आहे. यामुळेच प्रशासनाचा माज वाढला असून सामान्य जनतेच्या जिवाशी खेळ सुरू आहे.

**रस्त्यावर उतरणार संघटना!**




या अन्यायाविरोधात आता संभाजी ब्रिगेड, रिपब्लिकन सेना आणि वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली आहे. हॉस्पिटलवर लवकरच गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली असून, गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे."यांचा माज उतरविल्याशिवाय आणि गुन्हा दाखल केल्याशिवाय आता शांत बसणार नाही अशी ग्वाही रिपब्लिकन सेनेचे नेते दीपक भाऊ पहुरकर यांनी दिली.

---

## लाखनी नगरपंचायतीचा भोंगळ कारभार उघड; घाणीच्या विळख्यात प्रभाग क्र. ६, नागरिक संतप्त

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी स्वप्नील काटवले** : लाखनी नगरपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या प्रभाग क्र. ६ मध्ये पाहायला मिळत आहे. नियमित साफसफाईचा अभाव, जागोजागी साचलेला कचरा, तुंबलेल्या नाल्या आणि परिसरात पसरलेली दुर्गंधी यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून नगरपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून या प्रभागातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचा आरोप करीत आहेत. रस्त्यांची दुरवस्था, अनियमित पाणीपुरवठा, साचलेले सांडपाणी आणि कचऱ्याचे वाढते साम्राज्य यामुळे परिसरातील जीवनमान खालावले आहे. विकासकामांच्या मोठमोठ्या घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्षात परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**पावसाळ्यापूर्वीच आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

पावसाळा तोंडावर असताना नाल्यांची योग्य साफसफाई न झाल्याने सांडपाणी जागोजागी साचले आहे. परिणामी डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**तक्रारींचा पाऊस, प्रशासनाचे मौन**

स्थानिक नागरिकांनी नगरपंचायत कार्यालयात अनेकदा तोंडी तसेच लेखी तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासनांची खैरात केली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण नसल्याने परिस्थिती आणखी बिघडत चालल्याचेही सांगण्यात आले.

**"कर भरतो, पण सुविधा कुठे?"**

"आम्ही नियमित घरपट्टी, पाणीकर आणि स्वच्छता कर भरतो. मग आम्हालाच घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छतेत का राहावे लागते? अधिकारी एसी कार्यालयातून बाहेर पडून शहराची वास्तविकता कधी पाहणार?" असा संतप्त सवाल प्रभागातील रहिवाशांनी उपस्थित केला आहे.




**आंदोलनाचा इशारा**

प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून कचरा हटवावा, नाल्यांची सफाई करावी आणि आरोग्यविषयक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा नगरपंचायत कार्यालयावर 'कचरा फेको' आंदोलन, धरणे आंदोलन किंवा तीव्र निदर्शने छेडण्यात येतील, असा इशारा स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे."नागरिकांच्या आरोग्याशी खेळ थांबवा, अन्यथा जनआक्रोशाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा," असा स्पष्ट संदेश नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाला दिला आहे.

---

# शेतकऱ्यांना पीक विमा मिळून देण्यास शिवसेने च्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/सय्यद इसा** : माहूर व किनवट तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील सन 2025 - 26 खरीप हंगामातील सोयाबीन पिक विमा पासून वंचित राहिलेल्या मंडळातील शेतकऱ्यांसाठी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रवि भाऊ राठोड. यांनी संबंधित सर्व प्रशासनासह माननीय नामदार श्री.हेमंत भाऊ पाटील यांच्याकडे पाठपुरावा करत संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्याकडे शिव संवाद दौरे दरम्यान हदगाव येथे पिक विमा संदर्भात सविस्तरपणे मांडणी करून शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून देण्यासाठी विनंती केल्याने शेतकऱ्यांच्या विषयाचं गांभीर्य लक्षात घेऊन पाठपुरावा करत अखेर वंचित सर्व शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्यास भाग पाडले.

माहूर तालुक्यातील सोयाबीन पीक विमास पात्र असलेल्या शेतकऱ्यांचा पीक कापणी प्रयोगात उंबरठा उत्पन्न दाखवणाऱ्या मंडळातील पीक कापणे प्रयोगांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईचे आदेश; शेतकऱ्यांना लवकरच भरपाई मिळणार खरीप हंगाम २०२५-२६ मधील सोयाबीन पीक विमा भरपाईसंदर्भातील प्रलंबित प्रकरणांना आता गती मिळण्याची चिन्हे दिसत असून, माहूर तालुक्यातील पीक कापणी प्रयोगांमध्ये झालेल्या त्रुटीं प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे.शिवसेने चे नांदेड जिल्हा सह संपर्कप्रमुख रवि उत्तमराव राठोड यांनी दिलेल्या निवेदनानंतर प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेत कार्यवाही सुरू केली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ पासून नुकसान भरपाई ही उत्पन्न आधारित पद्धतीने देण्यात येत



आहे. जिल्ह्यातील १३ महसूल मंडळांपैकी ५ महसूल मंडळांतील सोयाबीन पीक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर झाली असली, तरी उर्वरित ८ महसूल मंडळांतील प्रकरणे तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित होती. माहूर तालुक्यातील चार महसूल मंडळांमध्ये झालेल्या पीक कापणी प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेतले होते. यामुळे हजारो शेतकऱ्यांची नुकसान भरपाई रखडली होती. या पार्श्वभूमीवर २९ मे २०२६ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सुनावणी समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत संबंधित प्रकरणांची सविस्तर सुनावणी घेण्यात आली असून, विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चितीची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.दरम्यान, पीक कापणी प्रयोगामध्ये हलगर्जीपणा किंवा चुका केल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले आहेत. उर्वरित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना लवकरात लवकर विमा भरपाई मिळावी यासाठी कृषी विभाग आणि विमा कंपनी स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या निर्णयामुळे पीक विमा भरपाईच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष होते. आत्ता मात्र पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना लवकरच सोयाबीन पकाची नुकासान भरपाई चा लाभ मिळणार आहे...यावेळी शिवसेनेचे नांदेड जिल्हा सहसंपर्क प्रमुख रविभाऊ राठोड यांनी माध्यामाशी बोलातंना सांगितले की शिवसेना पक्ष हा नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो 80 टक्के समाजकारण व 20 टक्के राजकारण हाच शिवसेना पक्षाचा धोरण असून एकनाथ भाई शिंदे साहेब चा दिल्लीतला नेता ते गल्लीतला कार्यकर्ता हा नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असणार असल्याचे यावेळी रविभाऊ राठोड यांनी बोलताना सांगितले व पुढे बोलताना म्हणाले की शेतकऱ्याना न्याय मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी बातमी प्रसारित केली अस्या सर्व वृत्तपत्र,वृत्तवाहिन्नी च्याप्रतीनिधीनचे आभार मानले आहे... तसेच शिवसेनेचे जिल्हा प्रमुख विवेक जी देशमुख,तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक, बालाजी मुरकुटे,मनोज तिरमणवार, विशाल जाधव, मेरसिंग पवार, जयपाल जाधव, सागर रुणवाल. या सर्व शिवसैनिकांच्या व पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने शेतकरी सुखावला आहे.